
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २९२
www.ramprahar.com
शनिवार, १० मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## युद्धजन्य परिस्थितीमुळे सागरी किनारपट्टीवर सतर्कता



**मुंबई :** भारत आणि पाकिस्तामध्ये पेटलेला संघर्ष दर दिवसागणिक आणखी धुमसताना दिसत आहे. अशातच पाकिस्तानच्या कुरापती थांबत नसून घुसखोरीसाठी सागरी मार्गाची निवड केली जाण्याची माहिती गुप्तचर यंत्रणांच्या सूत्रांमार्फत मिळत आहे. या पार्श्वभूमीवर समुद्रकिनाऱ्यांवर सतर्कता बाळगली जात आहे. फक्त मुंबईच नव्हे, तर कोकण आणि देशातील इतरही महत्त्वाच्या किनाऱ्यांच्या सुरक्षेकडे अधिक लक्ष दिले जात आहे. सुट्ट्यांचे दिवस आणि पर्यटकांची होणारी गर्दी लक्षात घेता मुंबईसह कोकणात समुद्र किनारी भागात संरक्षण दलाच्या हालचाली वाढल्या असून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शिवाय कोणत्याही संशयित बोटी किंवा हालचाली दिसल्यास पोलिसांना याची तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे.

अंतरंग
मुंबईच्या जवानाचे देशासाठी बलिदान/२
सावित्री खाडीपात्रातील अवैध वाळू उत्खननावर कारवाई/५
आयपीएल स्थगित; बीसीसीआयचा निर्णय/८

## पाकिस्तानचा ड्रोन हल्ला
# भारताने हाणून पाडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानची झोप उडाली आहे. भारतीय लष्कराच्या दणक्याने बिथरलेल्या पाकिस्तानने गुरुवारी रात्री भारताच्या उत्तर व पश्चिम भागातील लष्करी तळांवर ड्रोन, क्षेपणास्त्र हल्ल्याचा प्रयत्न केला, पण भारताने हे हल्ले हाणून पाडले. याबाबत शुक्रवारी (दि. ९) परराष्ट्र आणि संरक्षण मंत्रालयाकडून संयुक्त पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली.



पाकिस्तानने भारतातील ३६ ठिकाणी ३०० ते ४०० ड्रोनच्या माध्यमातून हल्ला केला. यातील बहुतांश ड्रोन नष्ट करण्यात यश आल्याची माहिती कर्नल सोफिया कुरैशी यांनी दिली तसेच हे सर्व ड्रोन तुर्कीमध्ये तयार झालेले होते, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय रात्री पाकिस्तानच्या एका सशस्त्र युएव्हीने भटिंडा लष्करी तळाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, ज्याला निष्क्रिय करण्यात आले. या हल्ल्याच्या बदल्यात पाकिस्तानात चार हवाई सुरक्षा तळांवर सशस्त्र ड्रोन्स लाँच करण्यात आले. यापैकी एका ड्रोनने एडी रडारला नष्ट केले.

पाकिस्तानने जम्मू काश्मीरच्या तंगधार, उरी, पूंछ, मेंढर, राजौरी, अकनूर, उधमपूर येथे मोठ्या कॅलिबरच्या आर्टिलरी गन आणि सशस्त्र ड्रोन्सचा वापर करत नियंत्रण रेषेवर गोळीबारही केला, ज्यामुळे भारतीय सेनेचे काही जवान शहीद व जखमी झाले तसेच दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, असेही कुरेशींनी सांगितले. पत्रकार परिषदेस परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, विंग कमांडर व्योमिका सिंग हेही उपस्थित होते.

## घुसखोरी करणाऱ्या सात दहशतवाद्यांचा खात्मा

**जम्मू :** सांबा सेक्टरमधून गुरुवारी रात्री भारतात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणारे जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे सात दहशतवादी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) कारवाईत ठार झाले आहेत. याबाबत बीएसएफने एका निवेदनाद्वारे माहिती दिली.



जम्मू फ्रंटियर बीएसएफच्या सांबा सेक्टरमध्ये ८ आणि ९ मेच्या मध्यरात्री दहशतवाद्यांच्या एका गटाने घुसखोरीचा प्रयत्न केला होता. या दहशतवाद्यांना घुसखोरी करता यावी यासाठी पाकिस्तानी रेंजर्सच्या चौकीतून गोळीबार करण्यात आला, पण बीएसएफच्या सतर्क जवानांनी घुसखोरीचा हा प्रयत्न निष्फळ ठरवत किमान सात दहशतवाद्यांचा खात्मा केला आणि पाकिस्तानी रेंजर्स पोस्टचे मोठे नुकसान केले, असे बीएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले.

लष्कराने या संपूर्ण घटनेचा एक व्हिडीओदेखील जारी केला आहे, ज्यामध्ये दहशतवादी घुसखोरी आणि गोळीबार करताना दिसत आहेत.

## भारतीय लष्करप्रमुखांना सरकारकडून विशेष अधिकार

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने एक मोठा निर्णय घेतला. सरकारने लष्करप्रमुखांना विशेष अधिकार दिले असून टेरिटोरियल आर्मीला सक्रिय करण्याचा आदेश जारी केला. याशिवाय भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांना गरज पडल्यास टेरिटोरियल आर्मीचे पाचारण करण्याचा अधिकार देण्यात आला.

केंद्राने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, भारतीय लष्करप्रमुखांना आवश्यक सुरक्षा प्रदान किंवा नियमित सैन्याला मदत करण्यासाठी टेरिटोरियल आर्मीतील प्रत्येक अधिकारी, नोंदणीकृत व्यक्तीला तैनात करण्याचे अधिकार देण्यात आले. टेरिटोरियल आर्मी भारतीय सैन्याची एक सहाय्यक लष्करी संघटना आहे. ही एक अर्धवेळ सेवा आहे, ज्यात नागरिक स्वयंसेवक आपत्ती व इतर आपत्कालीन परिस्थितीत सहभागी होऊ शकतात. ते सामान्यतः नोकरीसह सैन्यातही काम करतात.

## रयत शिक्षण संस्थेला सदैव मोलाची साथ!
# लोकनेते रामशेठ ठाकूर व सौ. शकुंतला ठाकूर यांचा कर्मवीर भूमीत हृद्य सत्कार




**सातारा : हरेश साठे**

रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी स्वतःच्या दातृत्वाने शंभर कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत करणारे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी दोन कोटी १२ लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्याबद्दल त्यांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते सातारा येथे कर्मवीर भूमीत हृद्य सत्कार करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६६वा पुण्यतिथी कार्यक्रम सातारा येथे समाधी परिसरात शुक्रवारी (दि. ८) झाला. या वेळी प्रारंभी कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली यांच्या समाधीला अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री मकरंद पाटील, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, व्हॉईस चेअरमन भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, आमदार दिलीप वळसे-पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार आशुतोष काळे, रोहित पवार, चेतन तुपे, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष गौरव फुटाणे, संस्थेचे उपाध्यक्ष राम कांडगे, अरुण कडू-पाटील, जयश्री चौगुले, सरोज पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू म्हस्के, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, संजीव पाटील, ज्योत्स्ना ठाकूर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

आपल्याकडील पैशांचा दातृत्वाने सदुपयोग कसा करायचा याचा आदर्श लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सगळ्यांसमोर ठेवला आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते माजी विद्यार्थी. कमवा आणि शिका योजनेत त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांनी शिक्षक म्हणूनही संस्थेत सेवा केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शहरांसोबतच आदिवासी व ग्रामीण भागातील रयत शिक्षण संस्थेच्या शाखांना वेळोवेळी गरजेनुसार उदार हस्ते मदत केली. संस्थेच्या गरजांवर तातडीने प्रतिसाद देण्याचे त्यांचे कार्य सातत्याने सुरू असते. **(पान २ वर..)**

> **रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेतून कर्मवीर अण्णांनी सामान्य कुटुंबातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करून दिली. त्याचबरोबर संस्थेच्या माध्यमातून अण्णांनी ज्ञानदान करणारे मोठे कुटुंब निर्माण केले. अण्णांच्या आशीर्वादाने संस्था उत्तरोत्तर प्रभावी काम करीत आहे.**
> **-खासदार शरद पवार, अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था**

## प्रत्येक जिल्ह्यात मॉक ड्रिल आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापन करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा घेतला आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी समग्र आढावा घेताना प्रत्येक जिल्ह्यात मॉक ड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करण्यासह विविध दिशानिर्देश दिले.



बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी युद्धजन्य परिस्थिती पाहता सांगितले की, ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे यांचे व्हिडीओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहचवा व व्यापक जनजागृती करा. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करावी. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावरही कारवाई करा.

प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन फंड आजच देणार आहोत, जेणेकरून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव या संदर्भात आला तर तो एक तासात मंजूर करा. एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या व त्यांनाही 'ब्लॅकआऊट'बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. **(पान २ वर..)**

## शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे समर्थकांसह आज करणार भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आणि समर्थकांचा शनिवारी (दि. १०) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश होणार आहे. खारकोपर रेल्वे स्टेशनसमोर, लोकनेते रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नंबर ६, सेक्टर १२, उलवे नोड या ठिकाणी सायंकाळी ५.३० वाजता हा पक्षप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



या पक्षप्रवेश कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, देवेंद्र साटम, सुरेश लाड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या वेळी शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यासोबत शेकापचे जिल्हा चिटणीस, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, माजी नगराध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष, माजी नगरसेवक-नगरसेविका, माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, सरपंच-उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

## मोरा-भाऊचा धक्का जलसेवा बंद

**उरण : प्रतिनिधी**

हवामान विभागाने खराब वातावरणामुळे धोक्याचा इशारा देणारा लाल बावटा लावल्याने मोरा-भाऊचा धक्का जलसेवा तात्पुरत्या स्वरूपासाठी बंद करण्यात आली आहे.

ब्रिटिश काळापासून मुंबईत ये-जा करण्यासाठी उरण मोरा व मुंबईतील भाऊचा धक्कादरम्यान जलसेवा सुरू आहे. या मार्गाने मुंबईत अर्ध्या ते पाऊण तासात पोहचता येते. त्यामुळे उरणमधील चाकरमानी, व्यावसायिक याच जलमार्गाचा अधिक वापर करतात. हवामान खात्याचा धोक्याचा इशारा संपल्यावर ही जलसेवा पूर्ववत होईल.

**(अधिक वृत्त पान ३ वर..)**




# ‘आपत्कालीन कार्य केंद्र २४X७ कार्यरत ठेवा’

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सध्या देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय आपत्कालीन कार्य केंद्र (ईओसी) २४X७ कार्यरत ठेवावेत असे निर्देश राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे लेखी आदेश निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण संदेश शिर्के यांनी दिले आहेत.



सर्व विभागाचे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय आपत्कालीन कार्य केंद्र (ईओसी) २४X७ कार्यरत ठेवावेत. कक्षात पोलीस/होमगार्डसच्या प्रशिक्षित नियुक्ती करावी तसेच आवश्यकता असल्यास एनसीसी, एनएसएस, नेहरु युवा केंद्र स्वयंसेवक, आपदा मित्र यांची नेमणूक करावी व त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

जिल्ह्याच्या अधिकृत समाज माध्यमांद्वारे आवश्यक माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी आणि अफवांना प्रतिबंध करावा. नागरिकांना अधिकृत माहिती बाबत माध्यमांबद्दल जागरुक करावे. कोणतीही चुकीची माहिती आढळल्यास त्यावर आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

आवश्यक असल्यास, जिल्ह्यासाठी सुरक्षित स्थलांतराची योजना तयार करावी. जिल्ह्यात कोणतेही युद्ध संबंधित सैन्याचे सामान आढळल्यास, नागरिकांनी ते स्पर्श करू नये याबद्दल तत्काळ जिल्हा नियंत्रण कक्ष व पोलीस नियंत्रण कक्षास कळवावे असेही कळविले आहे.

**आदिवासी न्याय अभियानाची अंमलबजावणी करा**

**रायगड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ नोव्हेंबर २०२३ झारखंडच्या खुंटी गावातून जनजाती गौरव दिनी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाची सुरुवात केली आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश प्रकल्प अधिकारी आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार हर्षिता भटनागर यांन येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पंतप्रधान जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण तेजस्विनी गलांडे यांसह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील दळणवळणास चालना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पश्चिमेकडून कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याकरिता विकसित करण्यात येत असलेल्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे (वेस्टर्न एन्ट्री इंटरचेंज) काम जून २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदलाद्वारे आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा परिचालनाच्या मार्गावर असून विमानतळाला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभावी याकरिता त्या परिसराच्या परिघातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळासोबत जोडण्याकरिता परिघीय मार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर (पोर्ट) कनेक्टिव्हिटी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे.

एनएचएआयतर्फे या अंतर्गत आम्र मार्ग, राज्य महामार्ग-५४ व राष्ट्रीय महामार्ग-४बी यांच्या विस्तारिकरणाकरिता निधी संकलन आणि अंमलबजावणीसाठी मुंबई-जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लि. (एमजेपीआरसीएल) या विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) कंपनीची स्थापन करण्यात आली आहे. एमजेपीआरसीएलमध्ये एनएचएआय, जेएनपीटी आणि सिडको यांची अनुक्रमे ६७.०४%, २६.९१% आणि ६.०५% इतकी भागीदारी आहे. एमजेपीआरसीएलतर्फे विमानतळालगतच्या राष्ट्रीय महामार्गांचा विकास आणि विस्तारीकरणाचे काम करण्यात आले असून प्रकल्पातील भागीदार म्हणून सिडकोने या प्रकल्पाकरिता ३००० कोटी रुपये मूल्याच्या जमिनीचे योगदान दिले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता या महामार्गाचे विस्तारीकरण ही महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी ठरणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिघातील महत्त्वाचे मार्ग आणि विमानतळ यांदरम्यान कनेक्टिव्हिटी प्रस्थापित व्हावी याकरिता सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळादरम्यान कनेक्टिव्हीट निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. आम्र मार्ग (राष्ट्रीय महामार्ग ३४८ए) आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीतरीत्या चालावी याकरिता एमजेपीरसीएलच्या प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, विमानतळाच्या पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग ४बी (राष्ट्रीय महामार्ग ५४८) सोबत कनेक्टिव्हिटी पुरविण्यासाठी पूर्व प्रवेश आंतरबदल मार्गाचा देखील समावेश करण्यात आला आहे. पूर्व प्रवेश आंतरबदल हा फुल क्लोव्हरलिफ प्रकारातील आहे.

पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग हा हाफ क्लोव्हरलिफ प्रकारातील असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या बहुउद्देशीय कनेक्टिव्हिचा महत्त्वाचा घटक आहे. सदर पश्चिम प्रवेश आंतरबदल हा उलवे किनारी मार्गाच्या १.२ कि.मी.च्या उन्नत विमानतळ जोड रस्त्याला जोडला गेला आहे. आंतरबदल मार्गावर दोन लूप आणि दोन रॅम्प यांचा समावेश आहे. आम्र मार्गावरून विमानतळाच्या दक्षिण बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता लूप ए व आम्र मार्गावरून विमानतळाच्या उत्तर बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता रॅम्प ए चा वापर करता येणार आहे.


लूप बी आणि रॅम्प बी द्वारे विमानतळाकडून आम्र मार्गाच्या अनुक्रमे उत्तर व दक्षिणेकडे जाण्याकरिता निर्गम मार्गांचा पर्याय असणार आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग प्रकल्पा अंतर्गत एक अतिरिक्त वाहन निम्नमार्ग आणि उलवे नदी परिवर्तित प्रवाहावरील लहान पूल यांचा समावेश आहे. जून २०२५ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत पश्चिम आंतरबदल मार्ग पूर्णत: कार्यान्वित होऊन वाहतुकीकरिता खुला होणे अपेक्षित आहे.

# मुंबईच्या जवानाचे देशासाठी बलिदान

**मुंबई : प्रतिनिधी**

पाकिस्तानच्या कपटी कारवायांना उधळून लावताना भारतीय सैन्य दलाचे दोन जवान शहीद झाले आहेत. त्यामध्ये, मुंबईतील रहिवाशी असलेले आणि मूळचे आंध्र प्रदेशचे असलेल्या मुरली नाईक यांना वीरमरण आले आहे.





भारतीय सैन्याचे दुसरे जवान दिनेश शर्मा यांनाही पूँछ सेक्टरमध्ये पाकिस्तानशी लढताना वीरमरण प्राप्त झाले. गोळीबारात जखमी झाल्यानंतर शर्मा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशासाठी लढता लढता ते शहीद झाले.

जम्मू काश्मीरजवळ पाकिस्तानच्या हल्ल्यात घाटकोपरच्या कामराज नगरमधील रहिवासी मुरली श्रीराम नाईक हे जवान शहीद झाले आहेत. मूळचे आंध्र प्रदेशचे रहिवासी असलेले नाईक कुटुंब हे कामराज नगरच्या झोपडपट्टीमध्ये राहत होते, मात्र काही दिवसांपूर्वी ही झोपडपट्टी पुनर्विकासात गेल्याने त्यांची घरे तोडण्यात आली आहेत. त्यामुळे, सध्या नाईक यांचे कुटुंब आंध्र प्रदेशाला राहण्यास गेले आहे. मुंबईतील घाटकोपर वार्ड क्रमांक १३३मध्ये मुरली नाईक यांच्या शहीद झाल्याचे बॅनर लावण्यात आले असून त्यांना स्थानिकांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.

९ मे रोजी पहाटे ३.०० वाजता झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान मुरली नाईक यांना वीरमरण आल्याचे या बॅनरवरून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी ट्विट करून शहीद जवान मुरली नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. नाईक हे सत्यसाई जिल्ह्यातील गोरंटला तालुक्यातील रहिवाशी होते. देशासाठी बलिदान देणाऱ्या मुरली नाईक यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो, नाईक कुटुंबीयांप्रती सहवेदना आहेत, असे ट्विट मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केले आहे.

# कार आणि एसटी बसचा अपघात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार आणि बसचा अपघात झाल्याची घटना ओएनजीसी सिग्नल जवळ घडली आहे. या अपघातात कारमधील चालक जखमी झाला आहे.

पनवेल शहरातील काळुंद्रे जवळील ओएनजीसी सिग्नलजवळ एसटी बस आणि कारचा अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली एसटी बस ही केळवणे येथुन पनवेलच्या दिशेने जात होती. एसटी बसला पाठीमागून आलेली कार धडकल्याने यात कारमधील चालक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले आहे. हा अपघात नऊ मे रोजी सकाळी साडेआठ ते नऊच्या दरम्यान घडला. अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेण्यात आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.



# पहलगाम हल्ला केला नसता तर ही वेळ पाकिस्तानवर आली नसती -ना. गोगावले

**पाली : प्रतिनिधी**

सध्या भारत व पाकिस्तान या दोन देशात तणावाची परिस्थिती पहावयास मिळत आहे. भारताने युद्धाची जोरदार तयारी केली आहे. काश्मीरमधील पहलगाम येथील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानमध्ये युद्ध परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानने हा हल्ला केला नसता तर ही वेळ आली नसती. आमच्या निष्पाप लोकांना त्यांनी मारले म्हणून आम्हाला हा करारा जवाब त्यांना द्यावा लागतोय, युद्ध होणे, पण गरजेचे आहे की पुन्हा भारताकडे ते वाकड्या नजरेने बघणार नाहीत, असे वक्तव्य मंत्री भरत गोगावले यांनी केले आहे. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी युद्धजन्य परिस्थितीवर भाष्य केले. सध्याच्या युद्ध परिस्थितीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय सैन्याचे त्यांनी तोंडभरून कौतुक सुद्धा केले आहे. या वेळी भरत गोगावले यांनी मिडियाला सांभाळून व सबुरीने कव्हरेज करण्याचा सल्लादेखील दिलाय.





युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आपण आणि शासकीय यंत्रणांनी सावधगिरी बाळगण्यासाठी ठिकठिकाणी मॉक ड्रिल घेण्यात आले. त्यामुळे ती प्रात्यक्षिके शासनाने करून दाखवली.

# पनवेल येथून कोल्हापूरला जाण्यासाठी थेट रेल्वेसेवा उपलब्ध करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथून कोल्हापूर जिल्ह्यात जाण्यासाठी थेट रेल्वे सेवा उपलब्ध नाही. तसेच मिरज ते कोल्हापूर व्यतिरिक्त कोल्हापूर जिल्ह्यात कोणताही रेल्वे मार्ग गेल्या १३४ वर्षात बांधल्या गेलेला नाही. त्यामुळे नवी मुंबई व पनवेल येथून कोल्हापूर जिल्ह्यात जाण्यासाठी सामान्य जनतेला एस.टी. व खाजगी बसेसवर मुख्यत्वेकरून अवलंबून राहावे लागते. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्हा रहिवासी संघ, यांच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी या अडचणी विरुद्ध आवाज उठवण्यासाठी सध्या प्रयत्न सुरू केले आहेत.

त्यातील एक भाग म्हणजे या संघाच्या शिष्टमंडळाने कोल्हापूरचे खासदार श्रीमंत छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या मुंबई येथील निवासस्थानी भेट घेऊन आपल्या मागण्या त्यांना कथन केल्या. त्यानंतर या आठवड्याच्या सुरुवातीला शिष्टमंडळातील काही सदस्यांनी खासदार धैर्यशील माने यांची कोल्हापूर येथे भेट घेऊन त्यांनाही निवेदन सादर केले. तसेच मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची पनवेल येथे भेट घेऊन त्यांनाही आपले निवेदन दिले.

या तीनही खासदारांनी संघाच्या रेल्वे बाबतीतील मागण्यांसाठी तातडीने रेल्वे मंत्र्यांकडे प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यातील खासदार माने यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहिले आहे. हे तिघेही खासदार या मागण्यांसाठी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करत असल्याने या मागणीला लवकरच यश येईल.







पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर व सौ. शकुंतला ठाकूर यांचा कर्मवीर भूमीत हृद्य सत्कार

कर्मवीर अण्णांनी तळागाळात शिक्षणाची गंगा निर्माण केली. त्यांचे कार्य निरंतर सुरू राहिले पाहिजे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर अग्रेसर राहिले आहेत व हा वारसा ते चालवत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असूनही त्यांनी रयत संस्थेला मातृसंस्था मानून या संस्थेच्या मदतीला स्वतःला झोकून देत खंबीर साथ दिली आहे. संस्थेने सांगायचे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ताबडतोब अंमलबजावणी करायची हे समीकरण चालत आले आहे.

मळलेल्या वाटेने कोणीही जातो, पण न मळलेल्या वाटेने जाणारेच इतिहास घडवतात. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा या दुर्गम भागात शिक्षणाची पंढरी उभी केली आहे. त्यांच्या दानातून अनेक शाखा उभारल्या गेल्या. त्यामुळे हजारोंच्या नाही, तर लाखोंच्या संख्येत विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत आहे.

कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजाचा विचार करीत रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज संस्थेच्या साडेसातशेहून अधिक शाखांमधून साडेचार लाख विद्यार्थी शिकत आहेत. या संस्थेच्या आणि पर्यायाने तळागाळातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कर्मवीर अण्णांचे कार्य पुढे घेऊन जाणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या कुटुंबाचे योगदान कायम अनमोल राहिले आहे. त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी देणगी रूपाने विशेष योगदान देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शकुंतला ठाकूर यांना हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक सन्मानित करण्यात आले.

या वेळी संस्थेच्या विविध शाखांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक विकास करून समाजाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या संस्थेच्या विविध शाखांना कर्मवीर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर माध्यमिक आणि महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्राध्यापक व शिक्षकांचा यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याशिवाय क्रीडा क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करून संस्थेचा लौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा आपल्या मनोगतातून विषद केला.

## प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापन करा

पोलीस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा. सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या. सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा, असेही मुख्यमंत्र्यांनी सूचित केले.

दरम्यान, राज्यातील महत्त्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

# सीवूड्समध्ये आजपासून योग शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

एसआरडब्ल्यूए आणि सहज योग, नवी मुंबई शनिवार (दि.१०) पासून सर्व शनिवार आणि रविवार सकाळी १० ते ११ या वेळेत श्री गणेश मंदिर, सेक्टर-४२, सीवूड्स, नवी मुंबई येथे ध्यान उन्हाळी शिबिराचे आयोजन केले आहे. हे उन्हाळी शिबिर सर्वांसाठी मोफत ठेवण्यात आले आहे.

उन्हाळी शिबिर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्यांनी नावे नोंदविण्याचे आवाहन संस्थेने केले आहे. यामध्ये योगाविषयी माहिती तसेच त्याचे फायदे, शरीराला कसे कोणते फायदे होतात याबाबत माहिती देण्यात येणार आहे.

यासोबत शारीरिक रचना, रोगांचे मुळ कारण, आपण का दुःख भोगतो? उपचार, तणावावरील व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन, व्यक्तिमत्व विकास, काम करणाऱ्या महिलांचा दृष्टिकोन, कौटुंबिक जीवन आणि सुसंवाद, संगीत थेरपी याबाबत माहिती दिली जाणार आहे.



**माणगाव : निजामपूर विभागातील शिरवली येथे भैरवनाथ मंदिरासमोरील भव्य सभामंडपाचे लोकार्पण मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले. या समारंभास विभागातील शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.**

# बेलापूर-पेंधर मेट्रोचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मेट्रो गाड्यांच्या नियमित देखभालीकरिता, सिडकोतर्फे रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर वर धावणाऱ्या मेट्रो सेवांच्या वेळेमध्ये बदल करण्यात आला असून त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक ११ मे २०२५ पासून अंमलात येणार आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार रविवारी आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी बेलापूर मेट्रो स्थानक आणि पेंधर मेट्रो स्थानक येथून सकाळी ०६.०० वाजता पहिली मेट्रो रवाना होईल. तर शेवटची मेट्रो फेरी बेलापूर मेट्रो स्थानक येथून रात्री १० वाजता व पेंधर मेट्रो स्थानक येथून रात्री ०९.४५ वाजता होणार आहे.

या दिवशी दर १५ मिनिटांनी मेट्रोची फेरी उपलब्ध असणार आहे. रविवार व सार्वजनिक सुट्ट्या वगळता इतर दिवशी नेहमीच्या वेळापत्रकाप्रमाणे मेट्रो सेवा उपलब्ध असणार आहे.

## निवडक

### शस्त्रासह एकाला अटक

**पनवेल :** एका सराईत गुन्हेगाराला देशी बनावटीचे गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसाह खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मन्नान गुड्डू शेख (वय १९) असे आरोपीचे नाव आहे. तो पनवेल रेल्वे स्टेशननजीकच्या नवनाथ नगर झोपडपट्टीत राहतो. मन्नान शेख हा खारघर येथील सेक्टर २८ मधील रांजणपाडा स्मशानभूमिजवळ संशयास्पदरित्या रात्री ८.३० वाजता गस्तीवरच्या पोलिसांना आढळून आला. त्याची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ देशी बनावटीचे १७ इंची लांबी बॅरलचे गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतूसे आढळून आली. गुन्हा नोंदला असून तपास सुरू आहे.

### पनवेलमधून स्कूटीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरात उभी केलेली स्कुटी गाडीची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे. शंकर शेट्टी यांनी त्यांची स्कूटी गाडी रेल्वे स्टेशन पार्कींग परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### धीरज थवई यांचा सत्कार



**पनवेल :** शहर पोलीस ठाण्यात सायबर विभागात कार्यरत असणारे पोलीस हवालदार धीरज नारायण थवई यांना नुकताच पोलीस खात्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस महासंचालक पोलीस पदक त्यांना नुकतेच मिळाल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

### तरुणीला फूस लावून पळविले

**मोहोपाडा :** शिल्पा संतोष कुशवाह (वय १६) या अल्पवयीन मुलीला तिच्या अज्ञातपणाचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून पळवून नेले असल्याची घटना घडली. याबाबत संतोष कुशवाह (वय ३८, रा. बळीराम पाटील चाळ, कालिवली, पो.आपटा, मुळगांव – परमा, राज्य बिहार) यांनी या मुलीची मिसिंग तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात दाखल केली असून शिल्पा संतोष कुशवाह, वर्णन वय १६ वर्ष पाच महिने, अंगात पिवळ्या रंगाचा फुल हाताचा सलवार कमीज, पायामध्ये काळी सँडल, उंची पाच फूट दोन इंच, चेहरा उभट, रंगाने सावळी, केस काळे लांब, डोळे काळे, गळ्यात लाल रंगाचा दोरा, डाव्या हातात काळा व लाल दोरा असे वर्णन असून अधिक तपास सुरू आहे.

# खराब हवामानामुळे मोरा-भाऊचा धक्का जलसेवा बंद

**उरण : प्रतिनिधी**

हवामान विभागाने खराब वातावरणामुळे धोक्याचा इशारा देणारा लाल बावटा लावल्याने उरण मोरा ते मुंबई भाऊचा धक्का ही जलसेवा तात्पुरत्या स्वरूपासाठी बंद करण्यात आली आहे. काल आलेल्या वादळी वाऱ्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने ही जलवाहतुकीची प्रवासी सेवा बंद करण्यात आली आहे. मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाचे थैमान सुरू झाले आहे. त्यामुळे प्रति तास ४०ते ५० या वेगाने वादळी वारे वाहू लागले आहेत.

यामुळे जलवाहतूला धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे हवामान विभागाने धोक्याचा इशारा देणारा लाल बावटा लावला आहे. न्हावा-शिवडी व उरण-बेलापूर/नेरूळ दरम्यानची रेल्वे लोकल सेवा मागील वर्षांपासून सुरू झाल्याने मोरा-मुंबई भाऊचा धक्का जलवाहतूक करणारे बोट मालकांचा व्यवसाय आधीच अडचणीत आला आहे. ब्रिटिश काळापासून मुंबईत ये-जा करण्यासाठी उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानची जलसेवा सुरू आहे.

### *इशारा संपल्यावर सेवा पूर्ववत*

**हवामान विभागाने मागील तीन दिवसांपासून समुद्रात धोक्याचा इशारा जाहीर केला आहे. त्यामुळे उरण मोरा ते मुंबई भाऊचा धक्का जलसेवा बंद करण्यात आली आहे. हा इशारा संपल्यावर ही जलसेवा पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे.**

या मार्गाने मुंबईत एवढ्या अर्ध्या ते पाऊण तासात पोहोचता येते. त्यामुळे उरण येथील चाकरमानी, व्यावसायिक याचं जलमार्गाचा अधिक वापर करीत होते. त्या पावसाळ्यात मोरा-मुंबई भाऊचा धक्का या जलमार्गावरील प्रवासाचे दर वाढविण्यात येतात. त्याचप्रमाणे वादळी वाऱ्यामुळे प्रवास करणे धोकादायक होत असल्याने प्रवासी पर्यायी मार्गाचा वापर करतात, मात्र या सर्वांचा मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या बोट व्यवसायावर परिणाम झाला आहे.



## रस्त्यावर सिमेंटचे ठोकळे ठेवून वाहनचालकांना लुटण्याचा प्रयत्न

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रात्रीच्या वेळेस रस्त्यावर सिमेंटचे ठोकळे लावून गाडी चालकाला लुटण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेल तालुक्यातील हरिग्राम-वाकडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडला आहे. या भुरट्या चोरांवर पोलिसांनी लवकरात लवकर अंकुश लावावा आणि त्यांना अटक करावी, अशी मागणी केली जात आहे.

पनवेलमध्ये चोरीचे प्रकार दिवसेंदिवस वाढू लागले आहेत. महावितरणच्या डीपी फोडून त्यातील तारा आणि ऑइलचीदेखील चोरी केली जात आहे. रस्त्यावर सिमेंटचे ठोकळे ठेवल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. चालकाने दाखवलेल्या सावधानतेमुळे चोरांचा डाव फसला. पनवेल तालुक्यातील हरिग्राम-वाकडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्रीच्या वेळेस चोरट्यांनी सिमेंटचे ठोकळे ठेवून हा रस्ता बंद केला होता.

या वेळी चार चाकी वाहन चालक वाहन घेऊन जात असताना त्याला हा प्रकार दिसून आला. त्याने सावधानता दाखवली आणि गाडी रिव्हर्स घेऊन तो मागे निघून गेला. त्यानंतर त्याने हा प्रकार आपल्या नातेवाईकांना सांगितल्यानंतर सात ते आठ जण त्या ठिकाणी पुन्हा आले आणि हा सारा प्रकार उघडकीस आणला. अशाप्रकारे रस्त्यांवर दगड ठेवून वाहन चालकाला मारहाण करून त्याला लुटल्याचे प्रकार अनेकदा इतरत्र घडले आहेत.

असाच प्रकार पनवेलमध्येदेखील सुरू झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे पनवेल तालुका पोलिसांनी याकडे लक्ष देऊन या चोरट्यांचा कायमचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.



## सारडे येथे व्यायामशाळेचे भूमिपूजन

**उरण : बातमीदार**

सारडे येथे दमदार आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून व्यायाम शाळेसाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्या व्यायामशाळेचा भूमिपूजन सोहळा गुरुवारी (दि.८) सकाळी १० वाजता उपस्थित प्रमुख मान्यवर भाजपचे माजी तालुकाध्यक्ष रवी भोईर यांच्या हस्ते झाला.



भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद बबन गावंड, तालुका महिला आघाडी अध्यक्ष राणी म्हात्रे, तालुका ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, तालुका शहर अध्यक्ष प्रसाद भोईर, उद्योगपती देवेंद्र पाटील, युवा नेते निलेश म्हात्रे, चिरनेर पंचायत गण अध्यक्ष प्रशांत ठाकूर, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, युवा नेते मुकेश म्हात्रे, भाजप गाव अध्यक्ष पाले अमित पाटील, पिरकोन ग्रामपंचायत सदस्य के.वाय.गावंड, सारडे ग्रामपंचायत सरपंच रोशन पाटील, सारडे उपसरपंच जीवन पाटील, अमित म्हात्रे, महेश पाटील, अस्मिता म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य प्रतिक्षा पाटील, सुवर्णा पाटील, ग्रामपंचायत अधिकारी संचिता गोंधळी, महेश पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी सत्यवान पाटील, सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, मनोहर पाटील, माजी सरपंच सारडे संदीप पाटील, माजी सदस्य भार्गव म्हात्रे, निशिकांत पाटील, रुपम पाटील, हितेश म्हाते, बळीराम पाटील, तुळशीराम पाटील, विनोद पाटील, हरिश्चंद्र पाटील, श्रीधर म्हात्रे, जगजीवन पाटील, गोपीचंद पाटील, संकेत पाटील, अजिंक्य पाटील, बालकृष्ण पाटील, प्रमोद पाटील, भालचंद्र पाटील, हेमंत पाटील, राकेश शिंदे, मयूर माळी, समाधान पाटील, सुशील पाटील, प्रितेश पाटील, वृषभ पाटील, हरेंद्र म्हात्रे, सर्व युवा कार्यकर्ते भाजप सारडे) तसेच सर्व सारडे ग्रामस्थ आदींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात झाला.

सारडे येथे युवकांना दर्जेदार व अत्याधुनिक सेवा सुविधानी युक्त असे व्यायाम शाळा आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून उपलब्ध होणार असल्यामुळे गावातील युवकांनी तसेच आजूबाजूच्या परिसरातील युवकांनी, ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी यांचे जाहीर आभार मानले आहेत.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मातोश्री श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर यांच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन शिवाजीनगर येथे करण्यात आले होते. देवसागर साधक समाज आणि शिवाजीनगर, गव्हाण, न्हावेखाडी, कोपर यांच्या वतीने संगीत भजन, प्रवचन, कीर्तन आणि माऊलींवर पुष्पवृष्टी अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, हिरामण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, अनंताशेठ ठाकूर, शिवाजी ठाकूर, बी.के. ठाकूर, किसन मोकल, पद्माकर ठाकूर, नितीन ठाकूर आदी या कार्यक्रमाला शुक्रवारी उपस्थित होते.**



**पनवेल : वासांबे ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंचपदी भूषण पारंगे यांची निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे माजी सरपंच लक्ष्मण पारंगे, भिंगारचे माजी प्रभारी सरपंच योगेश लहाने, वासांबे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नामदेव कोकंबे, भाजप कार्यकर्ते सतिश महाडिक आदींनी अभिनंदन केले.**

## सातारा येथे गव्हाण विद्यालयातर्फे आर्मी डान्स

- *भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद*
- *भारतीय लष्करातील वरिष्ठ राष्ट्रपती विजेत्या अधिकाऱ्यांची उपस्थिती*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त साताऱ्यात दरवर्षी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये यावर्षी संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला गुरुवारी (दि.८) आर्मी डान्स भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत लक्षवेधी आणि आकर्षक ठरला.

'कर्मवीर पुण्यतिथी' निमित्त सांस्कृतीक कार्यक्रम ९ मे हा पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीचा दिवस... या दिवसाचे अवचित्त साधून दरवर्षी ७ व ८ मे या दिवशी पाचही विभागातून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वेळी ८ मे २०२५ रोजी श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपरच्या १४ विद्यार्थ्यांनी आर्मी डान्स सादर केला.



या नृत्याचे वैशिष्ट्ये म्हणजे संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक त्याचप्रमाणे जनरल बॉडी सदस्य यांच्याबरोबरच जम्मू-काश्मीरमधील सध्याचे भारतीय जवान राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री शैलेश भोसले यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थिती लाभली. या वेळी सादर झालेल्या गव्हाण विद्यालयाच्या आर्मी डान्सचे त्यांनी तोंड भरून कौतुक केले. विशेषतः आरोही नाळे या इयत्ता सहावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीचे त्यांनी कौतुक करत ऊरी हल्ल्याची आठवण करून दिली. सर्व विद्यार्थ्यांनी या भारतीय जवानास विनम्र अभिवादन करून आशीर्वाद घेतले.

प्रत्यक्ष भारतीय जवानास पाहून सर्वांनाच गहिवरून आले. श्री शैलेश भोसले यांनी गव्हाणच्या या बाल वीरांना खूप खूप शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे प्रेक्षकांची ही पसंती या समूह नृत्याला लाभली. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उप प्राचार्य लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी प्रोत्साहन दिले. या विद्यार्थ्यांना घेऊन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, संदीप भोईर, सारिका ठाकूर आणि सोनाली घरत हे शिक्षक स्वतः सातारा येथील संस्था ऑफिसमध्ये कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित होते. या वेळी रायगड विभागीय मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्स्ना ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनाली घरत, हर्षला पाटील, विशांत ठाकूर आणि गणेश भोईर तसेच कोळी जे एस यांनीही विशेष प्रयत्न केले. या वेळी आर्या कडू, सारा घरत, आरोही नाळे, अर्चना चव्हाण, वैष्णवी चिकणे, संस्कृती वैराट, नित्या पाटील, वैदेही मोकाशी, आर्यन गुडदे, मृत्युंजय भारती, अमित डांगर, सुयश चिकणे, ओम सांगळे सिद्धार्थ कांबळे बालकलाकारांनी नृत्याविष्कार सादर केला.

## इनरव्हिल क्लबतर्फे नानोशी येथे हॅपी स्कूल उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक हॅपी स्कूल बनविण्याचा उपक्रम इनरव्हिल क्लब ऑफ पनवेल सिटी यांच्या मार्फत नानोशी, ता. पनवेल या आदिवासी गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत नुकताच राबविण्यात आला.

इनरव्हील क्लब ही एक आंतरराष्ट्रीय महिला संस्था आहे. या संस्थेमार्फत समाजातील वेगवेगळ्या स्तरातील महिला एकत्र येऊन सामाजिक बांधिलकीतून अनेक वेगवेगळे समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. असाच इनरव्हिलमार्फत दरवर्षी राबविला जाणारा उपक्रम म्हणजे हॅपी स्कूल. या उपक्रमांतर्गत क्लबमार्फत आपल्या जवळच्या परिसरातील जिल्हा परिषदेची एखादी गरजू शाळा निवडून तेथे त्या शाळेला आवश्यक असणाऱ्या बाबींची स्वनिधीतून पूर्तता करण्याचा प्रयत्न केला जातो. अशाच प्रकारे हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

या ठिकाणी क्लबमधील जवळजवळ ३५ ते ४० सदस्यांनी मिळून एक लाखांपेक्षा जास्त निधी जमा करून शाळेच्या वर्गाला आतून बाहेरून अतिशय सुंदर असे शैक्षणिक पेंटिंगचे काम करून देण्यात आले तसेच शाळेची सुरक्षा भिंत व पाण्याच्या टाकीलाही सुंदर अशा चित्रांच्या सहाय्याने रंगविण्यात आले.

इतकेच नाही तर वर्गात पुस्तके ठेवण्यासाठी कपाट, खुर्च्या, टेबल, मुलांना बसण्यासाठीचे बेंचेस, चप्पल स्टँड, खेळाचे साहित्य व मुलांना गणवेश इ. साहित्यदेखील या संस्थेमार्फत देण्यात आले. अतिशय कमी वेळात अध्यक्ष प्रतिभा डांगी व माजी अध्यक्ष ध्वनी तन्ना यांनी प्रयत्न करून शाळेच्या मुख्य शिक्षिका सोनल गावंड यांच्या मदतीने शाळेचे रंगरूप बदलून टाकले.

या कामी अर्चना परेश ठाकूर यांनी तसेच त्यांच्या वीर वूमन्स फाउंडेशन या संस्थेने तसेच अरिहंत पेन्टस पनवेल यांनीदेखील आर्थिक सहाय्य करून मोलाची मदत केली. इनरव्हील क्लबच्या जिल्हाध्यक्ष डॉ. शोभना पालेकर यांच्या हस्ते कायापालट केलेल्या नवीन वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी अध्यक्ष प्रतिभा डांगी, माजी अध्यक्ष ध्वनी तन्ना, सेक्रेटरी वैशाली करारिया, खजिनदार हेतल बालड, एडिटर ममता ठक्कर, विजयता कोठारी, मिनी राजपुत, अरुंधती बंडसोडे, शिल्पी भोनसुले, तनिशा चेतवानी, प्रिया चतुर्वेदी तसेच वीर वूमन्स फाऊंडेशनच्या किर्ती मुनोत व श्रुती निसर, शिक्षिका सोनल गावंड, शिक्षक गणेश खैरे, नानोशी ग्रामपंचायत सरपंच संगीता राजेंद्र पाटील, ओवळे केंद्रप्रमुख अंकिता हुदार, शा.व्य.स. अध्यक्ष सीमा पारधी, उपाध्यक्ष विमल ठाकरे, तुळसा, गिरा, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

उपस्थितांकडून संस्थेच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डान्सद्वारे आपल्या संस्कृतीचे प्रदर्शन करून मने जिंकली. कार्यक्रमानंतर मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## संपादकीय

# अफवांमागे कुटिल डाव

‘युध्दस्य कथा रम्या’ असे म्हटले जाते. युद्धात नेमके काय घडते आहे हे जाणून घेण्याची उत्कंठा सामान्यांना असते. युद्ध आपल्या घरापाशी तर नाही ना येऊन ठेपणार याचे धास्तावलेपणही त्याच्या मुळाशी असते. सध्याच्या भारत–पाकिस्तान संघर्षात लोक क्षणाक्षणाची बित्तंबातमी जाणू इच्छित असताना समाजमाध्यमांवर या संघर्षाविषयी अफवांचे पीक आले आहे. यामागील पाकिस्तानचा कुटिल डाव ओळखून अफवा पसरवणे टाळलेच पाहिजे.

**जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे जो दहशतवादी हल्ला पाकिस्तानकडून करण्यात आला, त्यात २६ पर्यटकांना क्रूरपणे कुटुंबियांच्या डोळ्यांदेखत ठार करण्यात आले. त्या हल्ल्याचे उत्तर देत भारताने पाकिस्तानच्या आजवरच्या सगळ्याच कारवायांचा हिशेब चुकता करण्यासाठी ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवले. परंतु अंतर्गत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांनी अर्धमेल्या झालेल्या पाकिस्तानची आगळीक शुक्रवारीही थांबताना दिसली नाही. त्यानंतर भारताने स्वाभाविकच पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्यास सुरूवात केली. गुरुवारी मध्यरात्री पाकिस्तानकडून भारतातील अनेक शहरांवर करण्यात आलेल्या ड्रोन हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर दिल्यानंतर भारताने आपली भूमिका स्पष्ट केली. आपल्याकडून तणाव वाढवणारी कोणतीही कारवाई केली जाणार नाही असे भारताने त्याआधी वारंवार स्पष्ट केले होते. परंतु तरीही पाकिस्तानकडून सातत्याने कारवाया सुरू राहिल्यावर मात्र भारताने पाकिस्तानला आम्ही मग अगदी शेवटपर्यंत जाऊ असा स्पष्ट इशारा दिला. आता पहिली माघार घेण्याची जबाबदारी पाकिस्तानची असेल. त्यांनी आक्रमक कारवाया केल्या तर भारताकडून चोख प्रत्युत्तर दिले जाईल. अद्यापही दोन्ही बाजूंनी युद्धाची अधिकृत घोषणा झाली नसली तरी प्रचंड संघर्ष सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवरच वेगवेगळ्या अफवा पसरण्यास सुरूवात झाली व त्यातून सामान्य नागरिक गोंधळून गेले. रात्रभर ज्या हल्ल्यांच्या कथित बातम्या आल्या, त्यातल्या कितीतरी घडलेल्याच नाहीत, हे नंतर दिवसभरात स्पष्ट झाले. यामागे पाकिस्तानचा हात असल्याचेही दिसले. नागरिकांमध्ये घबराट पसरवणे, त्यासाठी समाजमाध्यमांवर अफवा पसरवणे हा सध्या युद्धाचा एक भागच बनला आहे. अमुक ठिकाणी हल्ला झाला, तिकडे विमान कोसळले, कुठे ड्रोन फिरत आहेत या अफवांसोबतच भारत–पाकिस्तान संघर्षामुळे एटीएम बंद राहणार असे फेक संदेशही पसरवले जात आहेत. युद्धाचे जुने फोटो व व्हिडिओ नवे म्हणून शेअर होत आहेत. काही वृत्तवाहिन्याही याला बळी पडल्या व त्यांनी समाजमाध्यमांवरील माहिती खरी असल्याचे गृहित धरून ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली. नंतर ती खोटी असल्याचे कबूल करण्याची नामुष्कीही या वाहिन्यांवर आली. हे टाळण्यासाठी वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे व सामान्य नागरिक या सर्वांनीच फक्त आणि फक्त सरकारी यंत्रणा, लष्कर व संबंधित विश्वसनीय सूत्रांकडून येणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवला पाहिजे. अधिकृतपणाची खात्री असल्याखेरीज कुठल्याही माहितीवर प्रतिक्रिया देऊ नये किंवा ती इतरांना पाठवू नये. कुठल्याही लष्करी हालचालींचे, वाहनांचे व्हिडिओ काढून ते समाजमाध्यमांवर टाकणे गैर आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. सगळ्यांनीच अफवांकडे जागरूकपणे दुर्लक्ष केले पाहिजे व कुठल्याही तऱ्हेने सुरक्षा दलांच्या कामात अडथळा आणणे टाळले पाहिजे. याउलट आणीबाणीच्या परिस्थितीसाठी तयार राहणे, आवश्यक औषधे, महत्त्वाची कागदपत्रे, पाणी आणि कोरडे धान्य जमा करून ठेवणे याची काळजी घेतली पाहिजे. या घटकेला स्थानिक शांतता अबाधित राखणे हे आपले कर्तव्य आहे. हा काळ देश म्हणून एक राहण्याचा आहे.**

# अहंकारावर नियंत्रण ठेवून समाधानी जीवन जगूया



उद्या (११ मे २०२५) जागतिक अहंकार जागरूकता दिन विशेष आहे. या आगळ्यावेगळ्या दिनानिमित्त विषयाचा घेतलेला धांदोळा...

अहंकार ही एक मानसिक आरोग्य स्थिती आहे, जी व्यक्तीच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणावर प्रभाव करते. ते काही प्रमाणात प्रेरणादायी आहे, परंतु त्याची सतत वाढ अनेक समस्यांना कारणीभूत ठरते, जे केवळ स्वतःचेच नाही तर त्याच्या सभोवतालच्या लोकांचेही जीवन विस्कळीत करते. फक्त स्वार्थाबद्दल किंवा मी आणि माझा विचार केल्याने आपण मानसिक शांती समाधानापासून दूर जातो. इतिहास साक्षी आहे की या अहंकारामुळे राजे–महाराजे, सत्ता, राज्य, कीर्ती, संपत्ती गेली. बहुतेक युद्धांचे मुख्य कारण अहंकार राहिला होता. अहंकारामुळे दररोज असंख्य आयुष्ये उद्ध्वस्त होतात आणि या अहंकारामुळेच लोक रागाच्या भरात चुकीचे निर्णय घेतात आणि जीवनातील शांती आणि आनंद हिरावून घेतात. आपले लहानशे जीवन मौल्यवान आहे, आपण ते मोकळेपणाने आणि शांततेने जगले पाहिजे. ते निराशा, भीतीत आणि रागात वाया घालवू नये, वेळ निघून गेल्यावर आयुष्यात पश्चातापाशिवाय काहीही उरत नाही. संशोधनातून असे दिसून आले आहे की आपल्या बहुतेक दुःखांचे कारण अदृश्य अहंकारी मन असते, ज्यामध्ये श्रेष्ठता, कनिष्ठता, पूर्वग्रह, इतरांचे स्वतःच मूल्यमापन करणे, हाताळणी, राग, मत्सर, भीती, संताप, व्यसन, ताण, हिंसाचार, वंशवाद, लिंगभेद, प्रशंसा, मान्यता, प्रतिक्रियावादीपणा, सहानुभूतीचा अभाव, एकटेपणा, निराशा, प्रचार, धार्मिक आणि जातीचे युद्धे इत्यादी खोट्या भावनांचा समावेश आहे.

जागतिक अहंकार जागरूकता दिन दरवर्षी ११ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. या मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या सर्वांना मदत करण्यासाठी आणि इतरांना या अदृश्य स्वरूपाच्या गैरवापराचे परिणाम अनुभवण्यापासून रोखण्यासाठी २०१८मध्ये अहंकार जागरूकता चळवळ आणि जागतिक अहंकार जागरूकता दिनाची स्थापना करण्यात आली. या दिवसाचे उद्दिष्ट अहंकाराशी संबंधित मुद्द्यांवर प्रकाश टाकणे, सर्वांना जागरूक राहण्यास, जागरूकता वाढविण्यास आणि स्वकेंद्रित किंवा अहंकारी वर्तनाविरुद्ध बोलण्यास प्रोत्साहित करणे आहे. अहंकारामुळे राग, पूर्वग्रह आणि हिंसाचार यासारख्या नकारात्मक वर्तनांना कसे जन्म मिळू शकतो हे समजून घेणे हे त्याचे ध्येय आहे. हा दिवस राग, संताप आणि हिंसाचार यासारख्या अहंकाराने प्रेरित वर्तनाचे नकारात्मक परिणाम अधोरेखित करतो आणि व्यक्तींना अशा प्रवृत्तींना आव्हान देण्यासाठी आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी प्रोत्साहित करतो. अहंकार या मानसिक अवस्थेवर प्रत्येकाने मात केली पाहिजे.

अहंकार निरोगी आणि अस्वस्थ दोन्ही असू शकतो; निरोगी अहंकार एखाद्या व्यक्तीला स्वतःची ताकद आणि कमकुवतपणा समजून घेण्यास मदत करते, ज्यामुळे अधिक वास्तववादी ध्येये आणि अधिक सकारात्मक स्व–प्रतिमा निर्माण होते, जी प्रेरणा आणि लवचिकतेसाठी महत्त्वाची असू शकते. आपल्या विचारांवर, भावनांवर आणि वर्तनांवर नियमितपणे चिंतन केल्याने आपल्याला ओळखण्यास मदत होते की आपला अहंकार आपल्या निर्णय घेण्यावर कधी प्रभाव पाडत आहे, तर इतरांचे दृष्टिकोन समजून घेणे आणि स्वीकारणे आपल्याला आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवण्यास आणि त्यांच्या प्रेरणांबद्दल गृहीत धरणे टाळण्यास मदत करू शकते. स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्याने आपल्याला अधिक सुरक्षित आणि निरोगी अहंकार निर्माण करण्यास मदत होऊ शकते. निरोगी अहंकार असलेले व्यक्ती कठीण परिस्थितींना चांगल्या प्रकारे तोंड देण्यास सक्षम असतात, ताणतणावाला रचनात्मक पद्धतीने तोंड देण्याची त्यांची क्षमता वाढवतात, सक्रिय सामना करण्याच्या धोरणांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतात.

अस्वस्थ अहंकाराचा आपल्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. जे लोक स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानतात, इतरांबद्दल सहानुभूतीचा अभाव बाळगतात आणि इतरांच्या दृष्टिकोनाचा आदर करत नाहीत त्यांच्यात अस्वस्थ अहंकाराची लक्षणे असतात. अति अहंकारामुळे टीका स्वीकारण्यात अडचण येते आणि सहानुभूतीचा अभाव निर्माण होतो, ज्यामुळे नातेसंबंध ताणले जाऊ शकतात आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. अहंकार एखाद्या व्यक्तीला टीकेबद्दल अतिसंवेदनशील बनवू शकतो, नकारात्मक अभिप्रायाने सहज चिडतो आणि स्वतःचा नाश करण्यास किंवा इतरांना हानी पोहोचवण्यास प्रवृत्त करतो. अस्वस्थ अहंकारामुळे टीका सहन करणे, संघर्षात सहभागी होणे आणि मर्यादा स्वीकारणे कठीण होऊन दीर्घकालीन ताण येऊ शकतो. ज्या व्यक्तींमध्ये अक्रियाशील अहंकार असते ते त्यांच्या भावना नियंत्रित करण्यासाठी नकार, टाळाटाळ किंवा मादक पदार्थांचा गैरवापर यासारख्या अयोग्य पद्धतीने सामना करू शकतात. अहंकार निर्णय घेण्याची क्षमता बिघडवू शकते आणि आवेगपूर्ण किंवा अविचारी निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकतो, ज्याचा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

जेव्हा अहंकार आपल्या नियंत्रणात असतो किंवा अहंकारामुळे आपण काळानुरूप लवचिक आणि बदलणारे बनतो, तेव्हा अहंकार आपल्याला काही नवीन ज्ञान देतो, जीवनात काहीतरी शिकवतो, आपण आपल्या चुकांमधून शिकतो आणि स्वतःमध्ये बदल घडवून आणतो आणि आपल्या कमकुवतपणा स्वीकारता, पण जेव्हा हा अहंकार आपल्या नियंत्रणाबाहेर जातो, तेव्हा हा मानवी अहंकार विनाशाकडे जाण्याचा मार्ग बनतो, कधीकधी अहंकार पाप आणि गुन्ह्याचे कारण देखील बनतो. आपण स्वतः यशस्वी होण्यापासून रोखत नाही, परंतु आपला अहंकार आपल्याला असे करण्यापासून रोखतो. काही लोक त्यांच्या अहंकारामुळे खूप मौल्यवान नातेसंबंध गमावतात. अहंकार आपल्याला आपण चुकीचे आहोत हे जाणवू देत नाही, अहंकारी आणि मत्सरी लोकांना कधीही मनःशांती मिळत नाही. अहंकार आपल्या मनावर आणि मेंदूवर असतो, एकतर आपण आपल्या मेंदूवर राज्य करतो किंवा तो अहंकार आपल्या मेंदूवर राज्य करेल. अहंकारी व्यक्ती स्वतःच्या चुका पाहत नाही किंवा इतरांच्या चांगल्या गोष्टीही पाहत नाही.

आपला अहंकार निरोगी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आपण त्याची मूळ कारणे समजून घेण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, नम्रता आचरणात आणली पाहिजे आणि सहानुभूती आणि आत्म–जागरूकता विकसित केली पाहिजे. यामध्ये आपली ताकद आणि कमकुवतपणा मान्य करणे, स्वतःवरील टीका बुद्धिमत्तेने आणि सहजतेने स्वीकारणे आणि इतरांच्या कल्याणाला प्राधान्य देणे समाविष्ट आहे. स्वतः सोबतच इतरांसाठी चांगले विचार करणे महत्वाचे आहे, आयुष्यात काम करताना आपले लक्ष साध्य करण्यासाठी ध्येय निश्चित करणे, ध्यानाचा सराव करणे, सकारात्मक स्व–संवाद वापरणे, आपले लक्ष वैयक्तिक लाभापासून अर्थपूर्ण अनुभवांकडे वळवणे यासारख्या प्रयत्नांतून आपण अहंकाराचा प्रभाव कमी करू शकतो आणि अधिक संतुलित आणि समाधानी जीवन जगू शकतो. निरोगी अहंकार ही चांगली गोष्ट आहे, कारण ती आपला आत्मविश्वास वाढवते, आपल्याला आपल्या भीतींना तोंड देण्यासाठी किंवा त्यावर मात करण्यासाठी प्रेरित करते, पण जेव्हा अहंकार आणि अभिमान नियंत्रणाबाहेर जातात तेव्हा ते आपल्याला नष्ट करतात. अहंकार आणि अभिमानावर नेहमी नियंत्रण ठेवा, त्यातून काहीतरी नवीन शिका. अहंकाराला खोटेपणा, ढोंग, देखावा, भांडण आणि स्पर्धेचे माध्यम बनवू नका. जेव्हा आपली नम्रता आपल्या अहंकारावर मात करेल तेव्हा आपण एक चांगले व्यक्ती बनू.

महात्मा गांधींनी म्हटले आहे. जर आपण आपला अहंकार सोडला तर आनंदाचा आणि समाधानाचा अनुभव येऊ लागेल.

**–डॉ. प्रीतम भी गेडाम**

## बदलते तंत्रज्ञान

### २३ हजार फेसबुक अकाउंटवर कारवाई



सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर गुंतवणुकीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर ‘मेटा’ने मोठी कारवाई केली आहे. कंपनीने म्हटलं आहे की, त्यांनी भारत आणि ब्राझीलमधील युजर्सना टार्गेट करणारी २३,०००हून अधिक फेक अकाऊंटंस आणि पेज काढून टाकली आहेत.

या स्कॅमर्सनी लोकांना फसवण्यासाठी लोकप्रिय युट्यूबर्स, क्रिकेटपटू आणि व्यावसायिक व्यक्तींचं फेक व्हिडीओ (डीपफेक) तयार केले. या व्हिडिओंमध्ये असं दिसून आलं की, जणू काही हे लोक काही गुंतवणूक एप्स आणि जुगार वेबसाइट्सचा प्रचार करत होते.

सोशल मीडिया पोस्टद्वारे लोकांना ‘लवकर पैसे कमवा’ अशा ऑफर दाखवल्या जात होत्या. त्यानंतर त्यांना चॅटिंग ॲप्सवर जाऊन गुंतवणूक करण्याचा सल्ला देण्यात आला. पुढे त्यांना गुगल प्ले स्टोअरसारख्या दिसणाऱ्या फेक वेबसाइटवर पाठवण्यात यायचं आणि तेथून त्यांना जुगार किंवा फेक गुंतवणूक एप्स डाउनलोड करण्यास सांगितलं गेलं.

मेटाने दिलेल्या माहितीनुसार, हे स्कॅम लोकांना मोठ्या परताव्याचं आश्वासन देऊन क्रिप्टोकरन्सी, शेअर बाजार किंवा रिअल इस्टेटसारख्या फेक योजनांमध्ये पैसे गुंतवण्यास प्रवृत्त करतात. कंपनीने असंही म्हटलं आहे की ‘फेसबुक मार्केटप्लेस’ वर अनेक स्कॅमर एक्टिव्ह होते, जे स्वतःला खरे सेलर म्हणून दाखवून लोकांकडून एडव्हान्स पेमेंट मागत असत. एका ट्रिकमध्ये, स्कॅमर जाणूनबुजून एखाद्या गोष्टीसाठी जास्त पैसे पाठवतात आणि नंतर रिफंड मागतात. नंतर ते प्रत्यक्ष पेमेंट रद्द करतात आणि दोन्ही पैसे घेऊन पळून जातात.

मेटाने सांगितलं की, ते आता त्यांच्या प्लॅटफॉर्मवर सतर्कता वाढवत आहेत. जर एखादं अकाऊंट संशयास्पद वाटत असेल किंवा युजरने डिलिव्हरीशिवाय आधी पैसे मागितले तर युजरला एक इशारा दिला जाईल. याशिवाय कंपनी आता सेलिब्रिटींच्या नावाखाली चालणारे स्कॅम्स पकडण्यासाठी फेशियल रेकग्निशन टेक्नॉलॉजीचा वापर करत आहे. ही ओळख प्रक्रिया ऑप्शनल आहे, म्हणजेच युजर स्वतःच्या इच्छेनुसार ती चालू करू शकतात.

# ख्यातनाम गीतकार जगदीश खेबुडकर



## निमित्त

कोल्हापुरात १० मे १९३२ रोजी जन्मलेले जगदीश खेबूडकर हे अत्यंत लोकप्रिय मराठी गीतकार म्हणून ओळखले जातात. गांधीजींच्या खुनानंतर त्यांच घर जाळलं गेलं, तेव्हा त्या राखेच्या ढिगाऱ्याकडे पाहून त्यांनी ‘मानवते तू विधवा झालीस’ हे काव्य रचून आपल्या प्रतिभेची चुणूक किशोर वयात दाखवून दिली होती. चित्रपटगीते या प्रकारात हातखंडा असणाऱ्या खेबूडकरांनी पोवाडा, अभंग, ओवी अशा सर्वच प्रकारात आपली प्रतिभा सिद्ध केली होती.

धुंद आज डोळे, धुंद एकांत हा, धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, धुंदीत गाऊ मस्तीत राहू, नाच गं घुमा कशी मी नाचू, कंबर लचकली, निसर्गराजा ऐक सांगते, निळे गगन निळी धरा, पिकल्या पानाचा देठ, प्रभू सोमनाथा, प्रेमाला उपमा नाही, बाई बाई मन मोराचा, बिब्बं घ्या बिब्बं शिक्कंकाई, ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर, मला इष्काचि इंगळी डसली, मला लागली कुणाची उचकी, मला हे दत्तगुरू दिसले, मला हो म्हनत्यात लवंगी मिरची, मी आज फूल झाले, मी जलवंती मी फुलवंती, या रावजी बसा भावजी, राजा ललकारी अशी रे, रुणझुणत्या पाखरा, वारा गाई गाणे, विठू माऊली तू माऊली जगाची, शुभंकरोति म्हणा मुलांनो, सख्या रे घायाळ मी हरिणी, सत्यम शिवम सुंदरा, स्वप्नांत रंगले मी, स्वप्नात साजणा येशील का, हलके हलके जोजवा, हवास मज तू हवास तू, हिरवा निसर्ग हा भवतीने, ही कशानं धुंदी आली, अगं नाच नाच राधे, अरे मनमोहना, आकाशी झेप घे रे पाखरा, आज प्रीतिला पंख हे लाभले रे, आली ठुमकत नार लचकत, एक लाजरा न् साजरा, एकतारीसंगे एकरूप झालो, ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे, कशी नशिबानं थट्टा आज मांडली, कसं काय पाटील बरं हाय का?, किती सांगू मी सांगू कुणाला, कुठं कुठं जायचं हनिमूनला, कुण्या गावाचं आलं पाखरू, कोण होतीस तू काय झालीस तू, चंद्र आहे साक्षिला, छबीदार छबी मी तोऱ्यात उभी, तुम्हांवर केली मी मर्जी, दाम करी काम येड्या, दिसला गं बाई दिसला, दे रे कान्हा चोळी अन् लुगडी, देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा, अशी त्यांची कित्येक गाणी आजही लोकांच्या ओठांवर असतात.

अंदाजे ४०० चित्रपटासाठी गीतांचे सर्व प्रकार जगदीश खेबुडकरांनी हाताळले. बालगीतापासून प्रेमगीते, नांदी, पोवाडा, भक्तीगीते, अंगाई गीते, कीर्तन, वासुदेव, कोळीगीत, गण, गौळण, वग, हादग्याची गाणी, भजन असे अनेक प्रकार हाताळले. सर्व थरांतल्या, सर्व वयोगटांसाठी अविस्मरणीय अशी गीतरचना सातत्याने त्यांच्याकडून होत आली

खेबुडकर यांना महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, गदिमा पुरस्कार, फाय फाउंडेशन पुरस्कार, व्ही. शांताराम पुरस्कार, शाहू पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. ३ मे २०११ रोजी त्यांचं कोल्हापूरमध्ये निधन झालं.

(साभार : बाईट्‌स ऑफ इंडिया)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### दररोज सकाळी एक वाटी डाळिंब खाण्याचे फायदे

उन्हाळ्याच्या दिवसांत भरपूर फळे खायला हवीत. विविध प्रकारची फळे नियमित खाणे शरीरासाठी फायद्याचे ठरते. फळे चवीलाही छान असतात आणि पौष्टिकही असतात. अनेक फळांमध्ये महत्त्वाचे गुणधर्म असतात. असेच एक फळ म्हणजे डाळिंब. डाळिंब हे सर्वांत आरोग्यदायी आणि पौष्टिक फळांपैकी एक आहे. दररोज एक वाटी डाळिंब खाऊन दिवसाची सुरुवात केली पाहिजे. ते अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे व पोषक घटकांनी भरलेले फळ आहे.



डाळिंब आतड्यांसाठीही एक वरदान आहे. डाळिंबामध्ये व्हिटॅमिन सी असल्याने ते रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास मदत करते आणि सर्दी व संसर्गापासूनही दूर ठेवते.

अँटीऑक्सिडंट्सनी समृद्ध असलेले डाळिंब त्वचेवरही जादू करते आणि ती चमकवते. त्यामध्ये फायबर जास्त प्रमाणात असल्याने ते आतड्यांच्या आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. डाळिंब शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्सनी भरलेले असून डाळिंब शरीराचे मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानीपासून आणि ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण करते. दरम्यान, याच संदर्भात हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सचे कन्सल्टंट जनरल फिजिशियन व मधुमेहतज्ज्ञ डॉ. रंगा संतोष कुमार यांनी सविस्तर माहिती दिली.

डाळिंबाचे पॉलीफेनॉल शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स म्हणून काम करतात, जळजळ कमी करतात आणि पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात. डाळिंबाचा रस रक्तप्रवाह सुधारू शकतो आणि त्याच्या दाहकविरोधी गुणधर्मांमुळे धमन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करतो, असे न्यूट्रेसी लाइफस्टाईलच्या संस्थापक, एमबीबीएस व पोषणतज्ज्ञ डॉ. रोहिणी पाटील म्हणाल्या.

डॉ. कुमार यांच्या मते, डाळिंब कोलेस्ट्रॉलची पातळी सुधारून रक्तदाब कमी करून आणि धमनीतील प्लेक जमा होण्यास प्रतिबंध करून हृदयाच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम करतात. आहारात जीवनसत्त्वे सी व के, पोटॅशियम आणि आहारातील फायबरसह आवश्यक पोषक घटकांचा समावेश असणे आवश्यक आहे. म्हणून तुम्ही सकाळी एक वाटी डाळिंब खाऊ शकता. त्यातील फायबरचे प्रमाण चांगले पचन होण्यास मदत करते, ज्यामुळे बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते.

डाळिंबातील फायबर जळजळ कमी करून आणि पचनास मदत करून आतड्यांच्या आरोग्यास मदत करते तसेच चांगली प्रतिकारशक्ती आणि दीर्घायुष्यासाठी संतुलित आणि वैविध्यपूर्ण आहारावर भर दिला पाहिजे, असेही डॉ. पाटील यांनी नमूद केले.

# सावित्री खाडीपात्रात वाळू उत्खनन

## महाडमधील मुठवली, केंबुर्ली येथे कारवाई; ३० लाखांचा दंड



**महाड : प्रतिनिधी**

महाडजवळील सावित्री खाडीपात्रात मुठवली व केंबुर्ली या दोन ठिकाणी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी केलेल्या धडक कारवाईनंतर अनधिकृत वाळू उपशावर सुमारे ३० लाखांची दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याचे महाड तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले.

महाड जवळील सावित्री खाडीमध्ये १ मे महाराष्ट्र दिन रात्रीच्या सुमारास जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या पथकाने अनधिकृतरित्या वाळू उपसा करणाऱ्या मुठवली तसेच केंबुर्ली येथील वाळू डेपोवर अचानक टाकलेल्या धाडीमध्ये अनधिकृत वाळू साठ्यावर कारवाई केली आहे. मुठवली येथील ओरिएंटल लिमिटेड कंपनी व्यवस्थापनाविरोधात व या कंपनीबरोबर ज्या शेतकऱ्यांनी जागेचा करारनामा केलेला आहे त्यांच्या विरोधात १३० ब्रास अनधिकृत वाळू उत्खननाचा वाळू साठा जप्त केला असल्याची माहिती तहसीलदार महेश शितोळे यांनी दिली. या ठिकाणी पंचनामा केल्यानंतर फक्त १३० ब्रास अनंतकृत वाळू साठा सापडला असून यावर तीस लाखाची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

**या ठिकाणी जवळपास १३० ब्रास वाळू अनधिकृतरित्या सापडलेले आहे यावर कारवाई करण्यात आली असून सुमारे ३० लाख रुपये दंड बसवण्यात आला आहे अन्य ठिकाणीदेखील अशाच प्रकारे कारवाई केली जाईल.**

**–महेश शितोळे, तहसीलदार, महाड**

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

मॉर्निंग वॉकला जाताना अज्ञात वाहनाच्या धडकेत दशरथ तातूराम कटके (रा. श्रीराम नगर, लौजी) यांना म्हामूणकर चौक येथे अज्ञात वाहनाने धडक मारून पलायन केले.

या अपघातात कटके गंभीर जखमी झाले, त्यांच्यावर नवी मुंबई सानपाडा येथील सुरज हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने हॉस्पिटलमधून सोडण्यात आले होते. पुढील किरकोळ उपचारासाठी खोपोली येथील जाखोटिया रुग्णालयत दाखल करण्यात आले होते, मात्र उपचार सुरू असतानाच निधन झाले.

कटके हे श्रीराम नगर येथील रहिवासी आहेत म्हामुणकर चौकात अज्ञात वाहनच्या धडकेत गंभीर जखमीं झाले होते.

# महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## निविदा सूचना क्रमांक ०५ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे शिवथरघळ येथे संरक्षक भिंत बांधणे ता. महाड. जि. रायगड | ६१३८९६९/– | ६२०००/– | ११८०/– | ६ महिने | वर्ग चार अ व वरिल |

### ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१३/०५/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२०/०५/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **२२/०५/२०२५** वेळ ११.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ १७९१**
**दिनांक : ०९/०५/२०२५** **विमाका/कोवि/२०२५–२०२६/३२**

# भारत–पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलीस प्रशासन सज्ज

## मॉक ड्रिल; सागरी व मर्मस्थळ सुरक्षा वाढवली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत–पाक सीमारेषेवर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशासह रायगड जिल्ह्यातही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. संभाव्य युद्धजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

पोलीस विभागामार्फत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मॉक ड्रिल्स राबविण्यात आल्या आहेत. अचानक होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्वरित व प्रभावी कारवाई कशी करावी, याचे प्रशिक्षण पोलीस दलास देण्यात आले आहे. यासोबतच सागरी सुरक्षाही अधिक कडक करण्यात आली आहे. किनारपट्टी भागात नाकाबंदी पॉईंट्स उभारण्यात आले असून लँडिंग पॉईंट्स, बेटे व सागरी गावे यांची नियमित पाहणी सुरू आहे. मच्छीमार बांधवांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले असून, अनोळखी बोट किंवा व्यक्ती आढळल्यास तातडीने पोलिसांना कळवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील मर्मस्थळांवरही सुरक्षा वाढवण्यात आली आहे. विशेषत: महत्वाच्या इमारती, सरकारी कार्यालये व गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे तसेच सोशल मिडिया देखील प्रशासनाच्या विशेष लक्षात असून, भारत–पाक तणावासंदर्भात आक्षेपार्ह पोस्ट, अफवा पसरवणाऱ्या किंवा द्वेषमूलक कमेंट करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

रायगड पोलीस प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे व कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. रायगड पोलीस तुमच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर आहे, असे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सांगितले आहे.

अॅड. तुषार एस. पाटील

## जाहीर नोटीस

**सदस्य, मोटार अपघात दावा प्राधिकरण तथा तदर्थ जिल्हा न्यायालय १ व अति. सत्र न्यायालय, भुसावळ**

**मो.अ.दा.क्र.३६४/२०२१**
**(जुना वाद क्र.३०७/२०१८)**
**चौकशी दिनांकः १०/०७/२०२५**
**निशाणी क्र.**

विठ्ठल विजय पाटील ........... अर्जदार/वादी
विरूध्द
१. दिनेश रामचरित तिवारी वगैरे .......... प्रतिवादी/सामनेवाले

**प्रती, सा.वाले–**

१. दिनेश रामचरित तिवारी, वयः ४२, धंदाः वाहन मालक, रा.डी–१/१–४, सेक्टर–१०, कलंबोली, पनवेल, रायगड ४१०२१८

ज्याअर्थी, उपरोक्त अपीलकार/अर्जदार यांनी या न्यायालयाकडे मो.अ.दावा अर्ज दाखल केला आहे, त्याअर्थी, याद्वारे तुम्हांला फर्मविण्यांत येते आहे की, तुम्ही सदर अपील/अर्जा विरूध्द कारण दाखविण्यासाठी चौकशी दिनांकाच्या दिवशी सकाळी ११:०० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास अपीलाची/अर्जाची एकतर्फा सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निदिष्ट केलेल्या दिनांकास किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दि.०९/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरून,**
**सही/–**
**आधिक्षक,**
**जिल्हा न्यायालय १, भुसावळ.**

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

## खोपोली नगरपरिषद, खोपोली

ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र.केएमसी/नगर रचना/५८८ दिनांक :– ०९/०५/२०२५

### जाहिर सुचना

**(महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे खंड १७३ अन्वये)**

खोपोली शहरातील मुख्य बाजारपेठ परिसरातील वाहनांच्या वाढत्या रहदारीचे व नागरिकांच्या वाढत्या वर्दळीचे नियमन करण्याकरिता सार्वजनिक रस्त्यांबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे. सबब, उक्त नमूद अनुसूचीच्या स्तंभ–२मध्ये नमूद सार्वजनिक रस्ते, स्तंभ–३ मध्ये नमूद प्रयोजनानुसार खुले करणे, बंद करणे किंवा अन्य प्रकारे सुधारण्याकरिता खोपोली नगर परिषद उद्देश जाहीर करीत आहे.

सार्वजनिक रस्त्यांमध्ये करण्यात येत असलेल्या सदर सुधारणांबाबत नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती, असल्यास, सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक (०१) महिन्याच्या आत खोपोली नगर परिषद कार्यालय, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३ या पत्त्यावर लेखी स्वरुपात नोंदवाव्यात, असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

**''अनुसूची ''**

| अ.क्र | सार्वजनिक रस्त्याचे नाव | प्रस्तावित उपाय |
|---|---|---|
| (२) | (२) | (३) |
| १ | खोपोली बाजारपेठ दिपक हॉटेल चौक ते खोपोली नगरपरिषद अग्निशमन केंद्र पर्यतचा बाजारपेठेतील रस्ता | एकेरी मार्ग |
| २ | दिपक हॉटेल चौक ते खोपोली बाजारपेठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक असा रस्ता | एकेरी मार्ग |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक – सोमजाई वाडी – दत्तसलून असा रस्ता | एकेरी मार्ग |
| ४ | श्री विमलनाथदादा जैन मंदिर – जनता विद्यालय ते भुयारी मार्ग असा रस्ता | एकेरी मार्ग |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते मुख्याधिकारी निवास ते मुंबई–पुणे महामार्ग असा जाणारा रस्ता | एकेरी मार्ग |
| ६ | डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक असा रस्ता | एकेरी मार्ग |
| ७ | हॉटेल कोकण वैभव ते जनता विद्यालय असा रस्ता | एकेरी मार्ग |
| ८ | दिपक हॉटेल चौक ते जैन मंदिर असा जाणारा रस्ता | एकेरी मार्ग |

**ठिकाण :– खोपोली**
**दिनांक :– ०९/०५/२०२५**

**सही/–**
**( पंकज पाटील)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**खोपोली नगरपरिषद**

# रोह्यात डॉ. वरुण वागळे यांचा सत्कार

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील प्रसिद्ध डॉ. आंनद वागळे आणि डॉ. मिनल वागळे यांचा सुपुत्र डॉ. वरुण वागळे यांनी वैद्यकीय क्षेत्रांतील मेडिकलमधील अति महत्वाची गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट ही उच्च परीक्षा पास होऊन धवल यश संपादन केले.

डॉ. वरुण व त्याची पत्नी उच्च शिक्षित इशा वागळे यांना श्री. दत्तगुरूंच्या आरतीचा मान देण्यात आला. त्यावेळी त्या दोघा उभयतांचा येथील श्री. गुरुदेव दत्त मित्र मंडळातर्फे पत्रकार अरुण करंबे, वकील विवेक मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी मंडळाचे भालचंद्र पवार, नितीन प्रभू, किशोर पाटील, संदीप गुरव, डॉ. मिनल वागळे, प्रतिभा कोंडे, विनिता गुजर, स्मिता करंबे, कल्पना पाटील, विदुला करंबे, विदिश किंजवडेकर, अमित पवार, कस्तुभ कोंडे, मनिष करंबे, गणेश सातामकर, माधव देशमुख आणि सूर्यकांत येरुणकर आदी सदस्य उपस्थित होते.

डॉ. वरुण वागळे म्हणाले की, मी या मातीत लहानाचा मोठा झालो. आणि छत्रपती शिवाजी महाराज नगरवासियांनी माझ्या घरच्यांनी माझा सत्कार केला त्याचा मला अतिशय समाधान आणि आंनद आहे. खरोखरच मी आपल्या सर्वांचा ऋणी आहे.



## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/पा.पु/नि.सु./वि.ट्रान्स.दु/ २३५/२०२५–२०२६ दिनांक : ०९–०५–२०२५

### जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागास खालील नमूद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | रोहा नगर परिषदेच्या डोलवहाळ संप व पंप हाऊस येथील एक २०० के.व्ही.ए. डिस्ट्रूबुशन ट्रान्सफॉर्मर आवश्यक त्या साहित्यासह दुरुस्ती करणे व कार्यान्वित करून देणे | ५००० | ५०० | कामाचे आदेश दिलेपासून ३० दिवस |

**निविदा अटी/शर्ती :–**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १३–०५–२०२५ पासून २१–०५–२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.

२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक १३–०५–२०२५ पासून २१–०५–२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये बर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.

३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोठ्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोठ्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक १३–०५–२०२५ पासून २१–०५–२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.

४) जी.एस.टी. (बस्तु व सेवा कर) कराचा पडणाऱ्या भाराचा विचार करूनच निविदेतील दर सर्व करांसहित असावेत. बिलाची आकारणी केलेनंतर कर अतिरिक्त अनुज्ञेय राहणार नाहीत

५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक २१–०५–२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल

६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.

८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

**सही/–**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष/सचिव, शेल सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.१४ए, सेक्टर–०४, येरला डेंटल कॉलेज समोर, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ जंगली तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील शेल सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.१४ए, सेक्टर–०४. येरला डेंटल कॉलेज समोर, खारघर येथे सुरक्षा भिंत पडली असुन, सुरक्षा भिंतीचे बांधकाम काम पुर्ण करणेस बाधित होत आहे. |
| २ | ओमकार सुरजमल झंवर, सी.टी.स. नं. ४९५ए, ४९५बी. ४९५सी, ४९६ए, ४९६बी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ वड झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सी.टी.स. नं. ४९५ए, ४९५बी, ४९५सी, ४९६ए, ४९६बी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| ३ | श्रुतिका मयूर जोशी. प्लॉट नं.ए.५, ३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ कंदब तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ए ५–३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| ४ | आमरांते को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं–०४. से– ९ई, डी–मार्ट जवळ, कळंबोली, नवी मुंबई. | ०१ पेरू तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील आमरांते को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं ०४, से– ९ई, डी–मार्ट जवळ, कळंबोली येथे प्रोडीयमवर गळती होण्याची शक्यता आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. १९९/२०२/२०२५**
**दिनांक :– ०९/०५/२०२५**

**सही/–**
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०९/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, ता.माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या हायटेक फार्मास्युटिकल पार्कचा विकास, संचलन, देखभाल आणि व्यवस्थापनासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) या तत्वावर विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्ताव ची विनंती | ₹ ०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १६/०५/२०२५ ते दिनांक ३०/०५/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील **कामांबाबत दिनांक** २१/०५/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर **नोंदवावेत**. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २३/०५/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# बाहेरगावी जाताना सावधगिरी बाळगा!

## पोलिसांचे नागरिकांना आवाहन



**पनवेल : वार्ताहर**

मे महिना म्हणजे चोरट्यांचा सुगीचा काळ. या कालावधीत बहुतेक कुटुंब आपल्या मुळ गावी अथवा बाहेरगावी फिरण्यासाठी जात असतात. नेमकी हीच संधी साधून चोरटे अशी घरी हेरून ते पूर्णपणे साफ करतात. या सुट्टीच्या हंगामात चोरट्यांचा सुळसुळाट वाढून चोरी, घरफोडी सारख्या घटना घडत असल्याने नागरिकांनी सुट्टीच्या हंगामात बाहेरगावी जाताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत बहुतेक नागरिक सहकुटुंब आपल्या मुळ गावी किंवा बाहेरगावी जातात, या सुट्टीच्या कालावधीत बंद घर म्हणजे चोरट्यांचा रान मोकळे असते. त्यामुळे मे महिन्यात घरफोडी-चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. घरफोड्या करणाऱ्या अनेक टोळ्या या सुट्टीच्या काळात परराज्यातून येऊन पनवेल व परिसरात तळ ठोकून असतात, ते यापूर्वीच्या घटनांवरुन दिसून आले आहे. अनेकदा घरफोडी करणाऱ्यांमध्ये परराज्यातील टोळीचा समावेश असल्याचे तसेच या टोळया बंद घरांचा माग काढ़त, घरफोड्या करत असल्याचे आढळून आले आहे.

घरामध्ये चोरी होऊ नये यासाठी बाहेरगावी जाण्यापूर्वी नागरिकांनी कोणती दक्षता घ्यावी, याबाबत पोलिसांकडून प्रत्येक वर्षी नागरिकांना महत्वाच्या सूचना दिल्या जातात, मात्र, नागरिक पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून बिनधास्त बाहेरगावी निघून जातात. परिणामी, चोरटे त्यांचे संपूर्ण घर साफ करुन पसार होतात, मात्र चोरी झाल्यानंतर पोलिसांना लक्ष्य केले जाते. त्यामुळे चोरी होऊ नये यासाठी नागरिकांनीदेखील आधी स्वतः काळजी घेणे, दक्ष राहणे आणि बाहेर जाताना त्याची माहिती पोलिसांना देणे गरजेचे असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

गावी अथवा बाहेरगावी जाताना घर नीट बंद करा. तसेच आपण बाहेर जात असल्याची कल्पना शेजाऱ्यांना द्या. जास्त काळ बाहेरगावी जायचे असल्यास आपल्या घरात जास्त पैसे, सोन्याचे दागिने ठेवू नये, गावाला जाण्याबाबत तसेच परत येण्याबाबतची माहिती परिसरातील पोलीस स्टेशनला द्यावी, बाहेर जाताना कपाटाच्या चाव्या सोबत घेऊन जावे. तसेच मौल्यवान वस्तू घरात न ठेवता बँकेच्या लॉकरमध्ये ठेवावेत. घरात नोकर ठेवताना, नोकराचे संपूर्ण नाव, गाव, वय, राहण्याचा पत्ता आणि संपर्क क्रमांक घेऊन ठेवावेत. नोकराचे मूळ राहण्याचे ठिकाण तसेच कुटुंबियांची माहिती घ्यावी, अशा सूचना पोलिसांनी केल्या आहेत.

त्याचप्रमाणे नोकरास ओळखणाऱ्या परिसरातील दोघांची नावे, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक, नोकराचा पासपोर्ट फोटो तसेच शक्य झाल्यास त्याच्या बोटाचे ठसे घेऊन ठेवावेत. नोकरासमोर आपल्या संपतीचे प्रदर्शन करु नये. नोकर घरात नसताना मौल्यवान वस्तू तसेच पैसे कपाटात ठेवावेत. कपाटांच्या चाव्या नोकराच्या हाती लागणार नाही, याची काळजी घ्यावी. रात्री झोपताना घराची दारे, खिडक्या, कंपाऊंडचे गेट व्यवस्थित बंद असल्याची खात्री करावी, शेजाऱ्यांना आपले फोन नंबर, कार्यालयाचा पत्ता, जवळच्या नातेवाईकांचा पत्ता, आदि आवश्यक असणारी माहिती देऊन ठेवण्याबाबत देखील सूचना पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत.


बहुतेक नागरिक बाहेरगावी फिरण्यासाठी गेल्यानंतर फेसबुक, इन्स्टाग्राम सारख्या सोशल मिडीयावर आपले फोटो टाकत असतात. सध्या चोरटे देखील सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असल्याने बाहेरगावी गेलेल्या कुटुंबियांची माहिती चोरटे सोशल मिडीयावरून मिळवितात, त्यानंतर बंद असलेले त्यांचे घर साफ करतात.

**सोशल मिडीयावर वैयक्तीक माहिती टाकू नका**

चोरट्यांनी सोशल मिडीयावरुन अशा प्रकारे माहिती मिळवून अनेक घरफोड्या केल्याचे प्रकार यापूर्वी उपडकीस आले आहेत. त्यामुळे बाहेरगावी गेलेल्या नागरिकांनी आपले फोटो, व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. याबाबत पोलिसांकडून जनजागृती देखील करण्यात येत आहे.

# उरणमधील धोकादायक इमारतींना नोटीस

**उरण : रामप्रहर वृत्त**



पावसाळ्यात धोकादायक इमारत कोसळून होणारे नुकसान टाळण्यासाठी उरण नगर परिषदेने शहरातील २५ इमारतींना नोटीस बजावल्या आहेत.

यात नागरिकांनी सुरक्षा म्हणून या राहत्या इमारती रिकाम्या कराव्यात अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. वादळी वाऱ्यांमुळे धोकादायक इमारती किंवा त्याचा भाग कोसळून जीवित हानी होऊ नये यासाठी दक्षता म्हणून ही कार्यवाही करण्यात येत आहे.

सतर्कता म्हणून उरण नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील धोकादायक इमारती रिकाम्या करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील निमुळत्या मार्गामुळे अशा धोकादायक इमारतींकडे जाण्यासाठी मार्ग उपलब्ध नसल्याने मदतकार्य पोहचविण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे उरण शहरातील धोकादायक इमारती रिकाम्या कराव्यात आशा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. आपत्कालीन काळात या इमारतीच्या नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी वास्तव्याची व्यवस्था करण्यात येणार आहे, मात्र त्यापूर्वी नागरिकांनी घरे रिकामी करावीत, अशी माहिती उरण नगर परिषदेचे नगर अभियंता निखील दोरे यांनी दिली.

# एटीएम कार्डचा गैरवापर करून वृद्धाची फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**


**एकाला अटक**

मोहोपाडा गावच्या हद्दीतील एस.बी. आय.बँक एटीएम येथे रिस येथे राहणारे गणेश तोताराम मोरे (वय ६९, रा. रिस, राजगड सोसायटी जवळ) हे पैसे काढण्यासाठी गेले असता सुरज विनोद ठाकूर (वय ३४, रा. कशेळी टोलनाका, भिवंडी, जि. ठाणे) व अण्णा शेट्टी (वय ४२) दोघा आरोपींनी गणेश तोताराम मोरे यांना एटीएम मशीन बंद असल्याचे सांगून त्यांना बोलण्यामध्ये गुंतवून हातचलाखी करून गणेश तोताराम मोरे यांचे एस.बी. आयचे एटीएम कार्ड बदलले. यानंतर एटीएम कार्डचा पासवर्ड पाहून त्याचा वापर करुन मोहोपाडा जनता विद्यालय येथील बॅक ऑफ इंडीयाच्या एटीएम मधून २० हजार रुपये काढून गणेश तोताराम मोरे यांची फसवणूक केली.

गणेश मोरे यांनी रसायनी पोलीस ठाण्यामध्ये याबाबत तक्रार केली असून पोलिसांनी या गुह्यातील एक आरोपी सुरज विनोद ठाकूर यास अटक करण्यात केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून बीएनएस कलम ३१८ (४), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास हवालदार एस.बी. पवार हे करीत आहेत.

# उरण तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**



मंगळवारी व बुधवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पडलेल्या पावसामुळे उरण तालुक्यातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक रात्रीच्या नऊच्या सुमारास कोसळलेल्या पावसाने येथील शेतकरी व आंबा बागातदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रब्बी कडधान्य पिके तसेच गुराढोरांना पावसाळ्यासाठी खाद्य म्हणून शेतात साठवून ठेवलेला पेंढा (वैरण) त्याचबरोबर घरांच्या छपरांचेही नुकसान झाले आहे.

उरण तालुक्यात बुधवारी रात्री नऊच्या सुमारास पावसाने मोठ्या प्रमाणावर बरसायला सुरुवात केली. त्यामुळे तालुक्यातील हळदी लग्न समारंभातील वऱ्हाडी मंडळींची मोठी तारांबळ उडाली. या अवकाळी पावसामुळे व वाऱ्यामुळे काढणीला आलेले आंबे गळून पडल्यामुळे आंबा बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, असे आंबा बागायतदार प्रफुल्ल खारपाटील यांनी सांगितले.

दोन दिवस रात्री उरण पूर्व विभागात वीज खंडित झाली होती. त्यामुळे नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागला. त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर विद्युत पुरवठा सुरळीत झाल्यामुळे येथील नागरिकांना दिलासा मिळाला.

# बनावट पावती पुस्तकाच्या आधारे शासनाची लाखोंची रॉयल्टी बुडवली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल व उरण भागातून गौण खनिज वाहून नेणाऱ्या पियुष एंटरप्रायजेस या कंपन्यांच्या मालकाने बनावट गौण खनिज वाहतुक पावती पुस्तक बनवुन त्यावर रायगडच्या जिल्हा खनिजकर्म अधिकाऱ्यांचा बनावट शिक्का मारुन त्या पावत्यांच्या आधारे दगडखाणीची बेकायदेशीरपणे वाहतुक करून शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडविल्याचे उघडकीस आले आहे.

पनवेल शहर पोलिसांनी बनावट गौण खनिज वाहतुक पावती पुस्तक बनविणाऱ्या पियुष एंटरप्रायजेस या कंपनीच्या मालकाविरोधात बोगस कागदपत्र बनविणे व त्या आधारे शासकीय महसुल बुडविणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऍथोरिटीने डिसेंबर २०२४ मध्ये रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात गौणखनिजाची वाहतूक झालेल्या बनावट पावत्या जमा करुन त्याबाबत माहिती दिली होती. रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी मिनाक्षी गोंधळी यांनी दोन्ही पावती पुस्तकांची तपासणी केली असता, त्या पुस्तकावर जिल्हा खनिजकर्म अधिकारी रायगड यांचा बनावट शिक्का असल्याचे आढळुन आले.

हे पावती पुस्तक हे पियुष एंटरप्रायजेस या कंपनीने तयार केल्याचे निदर्शनास आले. यावरुन सदर बनावट गौण खनिज पावत्यांच्या आधारे दगडखाणाची बेकायदेशीरपणे वाहतुक करुन शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर मंडळ अधिकारी गोंधळी यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी पियुष एंटरप्रायजेस या कंपनीविरोधात फसवणूकीसह बनावटगीरी करणे, तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

या बनावट गौण खनिज वाहतुकीच्या पावत्या कुठे छापण्यात आल्या, तसेच त्यावर मारण्यात आलेले जिल्हाधिकारी कार्यालयाचे शासकीय शिक्के कुठे तयार केले? याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

# फॉर्टिफाईड राईस परदेशात पाठवण्याचा प्रयत्न उधळला

**पनवेल : वार्ताहर**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत फॉर्टिफाईड राईस परदेशात पाठवण्याचा प्रयत्न पनवेल शहर पोलिस आणि पुरवठा अधिकारी पनवेल यांनी उधळला आहे. या कारवाईत पळस्पे येथील एका खासगी कंटेनर यार्डमधून तब्बल ३१९.७५ क्विंटल तांदूळ आणि ट्रॅक पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी ट्रकचालक आणि धान्य मालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई गुप्त माहितीच्या आधारे पुरवठा अधिकारी अश्विनी दानवे यांच्या पथकाने केली. हा ट्रक परदेशी निर्यातीसाठी कंटेनर यार्डमध्ये पाठवण्यात आला होता, मात्र तपासणीदरम्यान पोलिसांना लक्षात घेतले की, ट्रकमधील तांदूळ फॉर्टिफाईड असून अशा प्रकारचा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) मधूनच वितरित केला जातो. त्यामुळे या धान्याचा वापर केवळ गोर गरीब आणि गरजूंसाठीच केला जाणे अपेक्षित असताना, त्याची निर्यात करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी ट्रक ताब्यात घेऊन सुमारे ३१९.७५ क्विंटल तांदळाची नोंद केली आहे.

यासोबतच, ट्रकचा चालक व धान्याचा मालक कोण आहे, हे शोधून काढण्यात आले असून त्यांच्यावर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या तांदळाचा प्रत्यक्ष वापर PDS साठी केला जात होता, की नाही, याची चौकशी सुरू आहे.

# गव्हाण विद्यालयात कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्रातील गरीब, दीन दुबळ्या दलित बहुजन समाजाला शिक्षित करण्यासाठी अवघे आयुष्य समर्पित करणारे महान कर्मयोगी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स च्या नूतन प्राचार्या सायली वडवलकर व माजी प्र.प्राचार्या प्रणिता गोळे यांचे हस्ते पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या वेळी गव्हाण विद्यालय ज्युनिअर कॉलेजचे माणिक घरत, अर्चना पाटील, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर व सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, प्रशांत परदेशी, विशांत ठाकूर, चारुशीला ठाकूर, द्रौपदी वर्तक, उज्वला म्हात्रे, उर्मिला गोंधळी, विद्या पाटील, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, एम.एन.एम.विद्यालयाच्या लेखनिक सारिका पाटील तसेच गव्हाण विद्यालयाचे सेवक जनार्दन खैरे, दयानंद खारकर आदी उपस्थित होते.

# बाप-लेक दोघांनी दिली बारावीची परीक्षा

## मिळाले सारखेच गुण



**पनवेल : वार्ताहर**

किरण अर्जुन गोरे हे माजी सैनिक असून सध्या महसूल विभागात तहसीलदार कार्यालय पेण येथे महसूल सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत. सन २०१३ साली १६ वर्षे देशाची सेवा करुन आर्मीमधून रिटायर झाले. आणि नंतर महाराष्ट्र शासनाची सरळ सेवा विभागाची परीक्षा देऊन महसूल विभागात रुजू झाले.

या दरम्यान त्यांचे दहावीनंतरचे पुढील शिक्षण घेणे राहुन गेले. आपल अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या १२ सायन्स मध्ये शिकत असलेल्या मुली सोबत परीक्षा द्यायची ठरवल आणि वावोशी हायस्कूल ता. खालापूर ह्या आपल्याच शाळेतून कला शाखेतून १७ नंबरचा (बाहेरून) फॉर्म भरून परीक्षा दिली. परीक्षेच्या वेळेस दिवस रात्र विधानसभा निवडणुकीचे काम आणि इतर सर्व जबाबदारी सांभाळुन जिद्दीने अभ्यास केला आणि परीक्षेत ७५ टक्के गुण मिळवून वावोशी हायस्कूल ता. खालापूर मध्ये शाळेत पहिला नंबर काढला. एका माजी सैनिकाने वयाच्या ४८ व्या वर्षी घवघवीत यश मिळवून आपल अर्धवट राहिलेले शिक्षण सुरू केले. तसेच त्यांच्या मुलीलासुद्धा सायन्समध्ये ७५ टक्के गुण मिळाले आहेत.

मुलगी आणि वडील दोघांनी सारखेच गुण मिळवून यश संपादन केल्यामुळे त्यांचे नातेवाईक आणि समाजामधे आणि महसूल प्रशासना मध्ये विशेष कौतुक केले जात आहे. ह्या मिळविल्या यशाबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन. ह्या यशामध्ये त्यांना शाळेचे शिक्षक कुटुंब, आणि मित्रांची चांगली साथ मिळाली अस त्यांनी सांगितले.

# घणसोली येथील बेकायदेशीर बांधकाम हटविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली गावातील अर्जुनवाडी येथील सुमारे नऊ इमारती या अनधिकृत असून या इमारतीवर तोडक कारवाई करण्या साठी मूळ जागामालक प्रवीण म्हात्रे यांनी नवी मुंबई पालिका अतिक्रमण विभाग यांना एकूण ६८ वेळा पत्रव्यवहार करूनदेखील कुठलीच कारवाई होत नाही. अनधिकृत बांधकामे त्वरित हटवावीत अशी विनंती म्हात्रे यांनी मनपा प्रशासन यांच्याकडे केली आहे.

तळवली, घणसोली येथील अर्जुन वाडी, पवित्रा अपार्टमेंट, विष्णू हाईट, गौरी अपार्टमेंट, विष्णू गगा अपार्टमेंट, शिवकृपा, मल्हार अपार्टमेंट, विष्णू अपार्टमेंट, गणेश दर्शन अपार्टमेंट व एकविरा अपार्टमेंट या बेकायदेशीर इमारतीबाबत नवी मुंबई मनपा, तसेच एफ विभाग घणसोली यांना एकूण ६८ तक्रार अर्ज करून ही या इमारतींवर निष्कासित करण्याची कारवाई होत नाही.

जमीन कै. घारु आप्पा म्हात्रे, यांच्या नावे असताना या जमिनीवर बेकायदेशीर चंद्राहास बाळकृष्ण म्हात्रे, प्रकाश रंगलाल जैन आणि सुधीर विष्णू पाटील या भुमाफियानी सदर जमिनीवर पाच मजली इमारती बांधून त्या गरजू लोकांना विकून त्यांचीही दिशाभूल केली असल्याचे तक्रारीत प्रवीण म्हात्रे यांनी म्हंटले आहे. तत्कालीन विभाग अधिकारी संजय तायडे व अतिक्रमण अधिकारी रोहित ठाकरे यांनी १० महिन्यापूर्वी एम.आर.टी. पी. ॲक्टप्रमाणे चंद्राहास बाळकृष्ण म्हात्रे व प्रकाश रंगलाल जैन, व या इमारतीमधील आठ (८) सदनिकाधारक यांच्या विरुद्ध रबाळे पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी पत्र दिले होते, मात्र आजपर्यंत या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल झालाच नाही, असे उत्तर नवनियुक्त एफ विभाग अधिकारी विष्णू धनावडे यांनी तक्रारीवर उत्तर देताना सांगितले आहे.

तक्रारदार प्रवीण बाबुराव म्हात्रे हे नवी मुंबई महानगर पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे व उपायुक्त अतिक्रमण भागवत डोईफोडे यांची भेट घेऊन या गंभीर प्रकरणाबद्दल चौकशी करावी व कारवाई करावी, अशी विनंती करणार आहेत.

> **घणसोली येथील अनधिकृत इमारती तोडक कारवाई संदर्भात प्रवीण म्हात्रे यांनी नवी मुंबई मनपा प्रशासन यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने प्रवीण म्हात्रे यांनी विचारलेली संपूर्ण माहिती प्रशासनाने दप्तरी उपलब्ध केली आहे.**
> **-विष्णू धनावडे, विभाग अधिकारी, एफ विभाग, नवी मुंबई मनपा**

# पनवेल तालुक्यातील पशूपालकांना योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली सात वर्ष ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पध्दत सुरू करण्यात आली आहे.

नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई, म्हशींचे व शेळी-मेंढी गट वाटप करणे, तसेच १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीसाठी अर्थसहाय्य देणे, व १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५ + ३ तलंग गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी https//ah.mahabms.com या संकेतस्थळावर गुगल प्ले स्टोरवरील उपलब्ध AH-MAHABMS हा ॲप डाऊनलोड करून आपल्या मोबाईलमधून २ मे २०२५ ते १ जून २०२५ या कालावधीमध्ये आपला अर्ज ऑनलाईन भरावा, अधिक माहितीकरीता टोल फ्री क्रमांक १९६२ नियोजित करण्यात आला असून, सोमवार ते शनिवार सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत किंवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग (पंचायत समिती, जिल्हा परिषद), जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयात संपर्क साधावा. योजनांची संपूर्ण माहिती तसेच अर्ज करण्याची पध्दती याबाबतचा संपूर्ण तपशील या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्विकारले जातील.

पनवेल तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांना अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, रायगड डॉ. सचिन देशपांडे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्यामराव कदम, पनवेल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी समीर वाठारकर, डॉ.आनंद मारकवार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# वाहतूक कोंडीचा विद्यार्थ्यांना फटका



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर शुक्रवारी (दि. ९) मोठी वाहतुक कोंडी झाली होती. माणगाव व इंदापूर येथे वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीचा फटका विधी विद्यार्थ्यांना बसला आहे.

माणगाव शहरात नामदेव सुर्वे लॉ कॉलेज व अशोकदादा साबळे लॉ कॉलेज ही दोन विधी महाविद्यालये आहेत. एलएलबी (तीन वर्ष कोर्स) प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षा बुधवारी सुरु झाल्या आहेत. या परीक्षा दोन सत्रांमध्ये आहेत. प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांची परीक्षा ही सकाळ सत्रात व द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांची परीक्षा दुपार सत्रात आहे.

या परीक्षेला जिल्ह्यातील विविध तालुक्यातील व जिल्हा बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांना माणगाव व इंदापूर येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. अनेक विद्यार्थी वाहतूक कोंडीमध्ये एक ते दीड तासाहून अधिक काळ अडकले, तर काही विद्यार्थ्यांनी वाटेतच उतरून पायी महाविद्यालयाची वाट धरली, असे अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी कपिल पाटील यांनी सांगितले.

> **इंदापूर ते माणगाव येथे सतत वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना परीक्षा सत्रास येण्यास विलंब होत आहे. यावर मुंबई युनिव्हर्सिटीकडून काही उपायोजना करता यावी यासाठी विनंती करीत आहोत.**
>
> **-डॉ. रवींद्र पांडुरंग राठोड,** प्राचार्य, नामदेव सुर्वे लॉ कॉलेज, माणगाव

> **परीक्षा देण्यासाठी सकाळी लवकर पनवेलवरून माणगावला निघालो. सावंतवाडी ट्रेनमध्ये खूप गर्दी असल्यामुळे प्रवाशांनी चढू दिले नाही. त्यानंतर पनवेल बसस्थानकात बसमधून निघालो. इंदापूर ते माणगाव वाहतूक कोंडी होती. अखेर कॉलेजच्या एक दीड किलोमीटर आधीच उतरलो आणि पायी कॉलेजला पोहचलो, मात्र तोपर्यंत परीक्षा सुरु होऊन पाऊण ते एक तास उलटून गेला होता.**
>
> **-विशाल खमेसरा,** विद्यार्थी

# चौक परिसरात विजेचा लपंडाव

## ग्रामस्थांकडून महावितरण अभियंत्यांना विचारणा



**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरात विजेचा लपंडाव सुरू झाला आहे. त्यामुळे त्रस्त नागरिकांनी याबाबत येथील महावितरण कंपनीचे अभियंता यांची भेट घेऊन चर्चा केली.

गेले काही दिवसांपासून चौक व परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भाजप चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, उपसरपंच सुभाष पवार, व्यापारी असोशियशनचे अध्यक्ष हर्षल हनमंते, जयराम कदम, विजय ठोसर यांच्यासह नागरिकांनी महाविरणचे अभियंता बोधनकर यांची भेट घेऊन सातत्याने होणाऱ्या वीजपुरवठा खंडितबाबत जाब विचारला.

नैसर्गिक आपत्तीमुळे हा प्रकार घडत असल्याचे अभियंता बोधनकर यांनी सांगितले. इतरही समस्यांकडे उपस्थितांनी लक्ष वेधले असता पावसाळ्यापूर्वी सर्व कामे केली जातील, असे लेखी आश्वासन देण्यात आले.

दरम्यान, भोकरपाडा फिडर ते चौक तुपगाव पुरवठा झाला तर भविष्यात अडचण येणार नाही. ही लाइन चौकपर्यंत आली असून तुपगाव येथे जोडणे शिल्लक आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे मत सर्वांनी व्यक्त केले.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची सभा



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे विभाग शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची मासिक सभा बुधवार दि. ७ मे रोजी प्रसिद्ध व्यापारी राजनशेट उपाध्ये यांचे निवासस्थानी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या सभेमध्ये संघटनेतील सदस्यांच्या अडीअडचणी व प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी विचारविनिमय करण्यात आला.

मासिक सभेचे औचित्य साधून संघटनेचे वयोवृद्ध सभासद नागोठणेजवळील कडसुरे ग्रामस्थ रामभाऊ भागोजी शिर्के यांना ८५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचा वाढदिवस आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, रामभाऊ शिर्के यांनी रोहा तालुक्यात ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी म्हणून सेवा केली आहे.

सेवानिवृत्त कर्मचारी संघटना नागोठणेच्या मासिक सभेला अध्यक्ष दत्ताराम झोलगे, उपाध्यक्ष दामोदर भोईर, सहसचिव नरेंद्र सोष्टे, के.के. कुथे, जयराम पवार, उल्हास नागोठकर, सुरेश जांबेकर, रामभाऊ शिर्के आदी पदाधिकारी व सभासद बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नायक मराठा मंडळातर्फे वधू वर परिचय मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

नायक मराठा ज्ञाती मंडळ विळे विभागाच्या वतीने वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार दि.११ मे रोजी दुपारी १२ वाजता श्री शंकर मंदिर सभागृह तासगाव या ठिकाणी करण्यात आले आहे.

मंडळातर्फे प्रतिवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार, इयत्ता दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षाविषयक मार्गदर्शन, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम, महिलांसाठी हळदीकुंकू, जागतिक महिला दिन, महिला आरोग्य शिबिर तसेच सैनिकी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जाते.

वधू वर परिचय मेळाव्यात वधू वरांनी व त्यांच्या पालकांनी नोंदणी करून उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष प्रताप बांदल, उपाध्यक्ष मनोहर धामुणसे, सचिव मंगेश पोळेकर, कोषाध्यक्ष देविका पाबेकर, प्रतिभा पोळेकर आदींनी केले आहे.

# श्रीवर्धनमध्ये खरीप हंगामपूर्व शेतकरी कार्यशाळा



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेचे आयोजन गणेश मंदिर सभागृह, रानवली येथे करण्यात आले होते. या वेळी तालुका कृषी अधिकारी श्रद्धा डुंबरे यांनी खरीप हंगाम महत्त्व व सद्यस्थितीत शेतकऱ्यांना परवडणाऱ्या शेतीबद्दल मार्गदर्शन केले तसेच विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभा घेण्याचे आवाहन केले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सिद्धेश सावंत, प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी भातपिकावरील किड रोग व्यवस्थापन, भात लागवड पद्धती तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी विकसित केल्याला विविध पिकाच्या ॲपसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

काळसुरी, ता. म्हसळा येथील प्रगतिशील शेतकरी सुधीर कविलकर यांनी एसआरटी लागवड तंत्रज्ञानसंदर्भात, भात पिकाची मशागत, व त्यानंतर लागवड ,सेंद्रिय निविष्टाचा शेतीमध्ये वापर याबाबत मार्गदर्शन केले.

अबोली शेलार, कृषी पर्यवेक्षक, बोर्ली पंचतन यांनी शेतकऱ्यांना होणारा अतिरिक्त खर्च कसा कमी करावा व बियाणे खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले.

खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी व सर्व तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत सहजरीत्या पोहचवणे या अनुषंगाने या कार्यशाळेत घरगुती बियाण्यांना बीज प्रक्रिया, उगवण क्षमता चाचणी व सीआयआय तंत्रज्ञानची प्रात्यक्षिक अनुक्रमे कृषी सहाय्यक विद्या गुंड, अमोल गाडगे व अभिजित गावडे यांनी करून दाखवण्यात आले तसेच पाणी फाउंडेशन मार्फत गट शेतीबाबतची व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आली.

कार्यशाळेस रानवली गावचे सरपंच सुरेश मांडवकर व इतर गावातील सरपंच उपसरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सयाजी इंगळे, कृषी पर्यवेक्षक यांनी केले तसेच सर्व उपस्थित शेतकऱ्यांचे आभार मानले व येणाऱ्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

# म्हसळ्यात खरीप हंगामपूर्व शेतकरी कार्यशाळा उत्साहात

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळ्यात खरीप हंगाम पूर्व शेतकरी कार्यशाळा नुकतीच केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय म्हसळा येथे झाली. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे हे होते. उपस्थितांना त्यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांसंदर्भात माहिती दिली.

कृषी पर्यवेक्षक सुजय कुसळकर यांनी शेतकऱ्यांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवडीबाबत माहिती दिली, मंडळ कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे यांनी माती परीक्षणाचे महत्त्व, त्यावर आधारित खत व्यवस्थापन कसे करावे याबाबत तर कृषी सहाय्यक लक्ष्मण खेडकर यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड, शेततळे, ठिबक सिंचन, कोकण जलकुंडबाबत माहिती दिली.

या वेळी तालुक्यातील काळसुरी येथील प्रगतशील शेतकरी सुधीर कविलकर यांनी एसआरटी लागवड तंत्रज्ञान संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. कणघर येथील प्रगतीशील शेतकरी धनंजय सावंत यांनी शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत हळद लागवड या नावीन्यपूर्ण उपक्रमाबाबत उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. त्यांनी हळद लागवड हा उपक्रम केल्यास जंगली श्वापदापासून शेती वाचवावी हे सांगत सध्या तालुक्यात पिकाखालील क्षेत्र कमी होत आहे ते वाढण्यास मदत होईल असे अभ्यासू मत मांडले.

तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय शिंदे यांनी तालुकास्तरीय शेतकरी कार्यशाळेच्या आयोजनाबाबत माहिती दिली आणि शेतकरी कविलकर व सावंत यांचे कौतुक केले. कृषी पर्यवेक्षक नरेश जामकर यांनी सूत्रसंचालन केले.

## भारतीय लष्कर आणि केंद्र सरकारचे अभिनंदन

**नागोठणे : बातमीदार**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील आतंकवाद्यांची केंद्रस्थाने उद्ध्वस्त करून पहलगामच्या हत्येचा बदला घेण्यात आल्याची बातमी आनंददायी आहे. नाठाळाच्या माथी हाणू काठी या संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या वचनाप्रमाणे भारतीय लष्कराने कामगिरी पूर्ण केल्याबद्दल राष्ट्रीय वारकरी परिषद, प्रणित वैदिक हिंदू वारकरी बहुउद्देशीय सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्याकडून भारतीय लष्कर आणि केंद्र सरकारचे अभिनंदन करण्यात आले आहे.

याबाबत वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष हभप बापूमहाराज रावकर पत्रक प्रसिद्धीस दिले आहे.

## वराठी येथे युवकाचा मृतदेह

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वराठी गावाकडून बेलवाडी गावाकडे जाणारे रोडलगत क्रिकेट ग्राउंडजवळ ८ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास २५ ते ३० वर्षीय वयोगटातील युवकाचे मृतवस्थेत उघड्यावर पडलेले प्रेत आढळले. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

मृतावस्थेत उघड्यावर पडलेल्या अनोळखी व्यक्तीची माहिती मिळताच घटनास्थळी रोहा पोलिसांनी जात माहिती घेतली. याबाबत आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार भोईर अधिक तपास करत आहेत. या संबंधित कोणतीही अधिक माहिती असल्यास रोहा पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


## आज बुरूड समाजाचा भव्य मेळावा

**रोहे** : रायगड जिल्हा बुरुड समाज आयोजित बुरुड समाजाचा भव्य दिव्य मेळावा व सत्कार सोहळा शनिवारी (दि. १०) मेघा चित्रमंदिर, अलिबाग येथे ९ वाजता आयोजित केला आहे.

या मेळाव्यास मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, हरेश पिंपळे, किशोर जोरगेवार, कृषी मूल्य आयोग अध्यक्ष पाशा पटेल हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर समाजातील अभिनेत्री वीणा जामकर, जान्हवी किल्लेकर, रिलस्टर जगदीश नागे, रसिका नागे, मायरा जामकर उपस्थित राहणार आहेत.

या वेळी मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप, व्यावसायिक कर्ज मार्गदर्शन, मोफत नर्सिंग कोर्स प्रवेश प्रक्रिया, बांबू हस्तकला प्रदर्शन असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# साळावचे विक्रम विनायक मंदिर



मुरूड तालुक्यातील साळाव-रोहा रस्त्यावर सन १९८५ साली बिर्ला उदयोग समुहाचा लोखंड शुध्दीकरणाचा प्रकल्प आला आणी बिर्लाच्या प्रथेनुसार प्रकल्प व वसाहत यांच्या मध्यभागी असलेल्या टुमदार टेकडीवर विक्रम विनायक मंदिर बांधण्यात आले. अल्पावधीत साळावचे विक्रम विनायक मंदिर (बिर्ला गणेश मंदिर) प्रसिध्दीस आले आहे.

अप्रतिम निसर्ग सौदर्याने नटलेला मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून जागतीक स्तरावर ओळखला जातो. साळाव येथील बिर्ला समुहाने बांधलेले श्री विक्रम विनायक मंदिर भाविक व पर्यटक यांचे खास आकर्षण ठरले आहे. अप्रतिम बांधकाम व मंदिराचे सभोवताली डोळयांचे पारणे फेडणारे अप्रतिम सुष्टी सौंदर्य साळाव बिर्ला मंदिरास वारंवार भेटी देण्यास भाग पाडते.

या मंदिराच्या बांधकामासाठी राजस्थान व गुजरात मधून आणलेल्या संगमवराचा वापर केला आहे. मुंबईच्या शापुरजी पालनजी बिल्डर्सने या मंदिराचे भव्य व दिव्य असे बांधकाम केले आहे. मंदिराच्या दर्शनी भागातच दोन सुंदर शिल्प असून मंदिराचे बांधकाम दोन सभामंडप व गर्भगृह अशा प्रकारचे आहे. सभामंडपाचे छत संपुर्णपणे पारदर्शक असून चारी बाजूंना सभामंडप खुला आहे. मुख्यः गाभार्यात श्री विनायकाची भव्य संगमवरी मूर्ती असून मूर्तीसोबत शंकर पार्वती, दुर्गामाता, रिध्दी-सिध्दी, राधा-कृष्ण, व सुर्यदेवांचीही मुर्ती आहे. या मूर्ती जयपुरच्या कसबी कारागीरांनी घडविलेल्या आहेत. मंदिराचा कळस लक्षवेधक असून आकाशात उंच, सुळक्यासारखा जाणार्या शुभ्र संगमवरी आहेत. मंदिरात नित्याने पुजअर्चा होते. त्यासाठी वृंदावनचे पुरोहीत पौरोहित्य करतात. मंदिरात भाविकांना दर्शनासाठी सकाळी सहा ते साडेअकरा व सायंकाळी साडेचार ते नऊ या वेळेतच प्रवेश खुला असतो.

मंदिर टेकडीवर उभारण्यात आले आहे, मंदिराकडे जाण्यासाठी पायर्या व बाजूने रस्ता उपलब्ध आहे. मंदिराचे सभोवताली रमणीय बगीचे असून हिरवेगार गवत डोंळयाना वेगळीच शांती देते. सायकांळी मंदिर व मंदिर परिसरातील आकर्षक विदयुत रोषनाईत हे मंदिर अधिकच आकर्षक दिसते. या मंदिराच्या सभोवताली कुंडलिका समुद्रखाडीतील अप्रतिम सुष्टीसौदर्यांचा आस्वाद घेता येतो. मंदिराच्या मागील बाजूकउून कुंडलिका समुद्र खाडीतील मच्छीमार नौका, तसेच नारळ पोफळीच्या बागायतीच्या हिरव्या गर्द झाडीत लपलेले चौल-रेवदंडा गावे, आग्राव बंदर, व चौलचे पर्वतवासी दत्तमंदिर नजरेत सामावल्याने वेगळाच आनंद प्राप्त होतो.

अल्पावधीतच हे मंदिर प्रसिध्दी आले असल्याने वर्षभर पर्यटक व भाविक येतात तसेच संकष्टी चतुर्थी, गणेश जयंती, अंगारकी संकष्टी या दिवशी श्री गणेशाच्या दर्शनासाठी दुरवरून भाविक येत असतात. मुरूउ पर्यटनासाठी मुंबई, पुणा, ठाणे आदी महाराष्ट्रातून आलेले पर्यटक तसेच रायगड जिल्हातील विविध तालुक्यातील भाविक तसेच पै-पाहूणे हे सुध्दा साळाव श्री विक्रम विनायक मंदिरास निश्चित भेटीस येतात. वन डे पिकनिकसाठी साळाव श्री विक्रम विनायक मंदिराला (बिर्ला मंदिरला) पंसती दिली जाते. यामध्ये सर्वधर्मिय मंडळीचा समावेश असतो. मंदिरामध्ये नित्यनियमाने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

मंदिर परिसरातील मुख्यःरस्तालगत स्थानिकांनी विविध स्टॉल उभारले आहे. यामध्ये नारळ, फुले, हार आदीची दुकाने थाटण्यात आली आहेत. तर आजूबाजूला विविध छोटी मोठी हॉटेल्सचा व्यवसायातून स्थानिकांना उत्पन्नाची संधी प्राप्त झाली आहे.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी ६ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात १२ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. मागील महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्या दरम्यान दाखवलेली सतर्कता, अनुचित घटना रोखण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय संरक्षा कार्यासाठी प्रशस्तिपत्र आणि २००० रू. रोख बक्षीस समाविष्ट आहे.

महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार मध्ये मुंबई विभागात (सी अँड डब्ल्यू) इगतपुरी विभाग अभियंता अनिल निंबाजी तेलोरे, भुसावळ विभागात (सी अँड डब्ल्यू) भुसावळ तंत्रज्ञ अमरेंद्र कुमार, नाशिक रोड (आरपीएफ) सहाय्यक उपनिरीक्षक दिनेश यादव, हेड कॉन्स्टेबल आनंद वाघ, नागपूर विभागात ट्रेन मॅनेजर अरविंद कुमार शर्मा, बल्लारशाह (आरपीएफ) सहाय्यक उपनिरीक्षक राम लखन, (डॉग स्क्वॉड) नागपूर हेड कॉन्स्टेबल नितीन नाईक, पुणे विभागात दौंड (सी अँड डब्ल्यू) सहाय्यक जितेंद्र कुमार, सोलापूर विभागात तंत्रज्ञ (ट्रॅक्शन) रोशन कुमार,तिलाटी ट्रॅक व्यवस्थापक, सोनू कुमार, (सी अँड डब्ल्यू) तंत्रज्ञ पोपट शिवाजी, (सी अँड डब्ल्यू) तंत्रज्ञ वसीम शेख यांचा समावेश आहे.

या वेळी महाव्यवस्थापक धर्म वीर मीना पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना आणि कर्तव्यांप्रती असलेल्या त्यांच्या सतर्कतेचे आणि समर्पणाचे कौतुक करताना म्हणाले की अशा सतर्कता आणि शौर्याच्या कृतींमुळे इतरांना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि जीवित, मालमत्तेचे आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा मिळेल.

कार्यक्रमास अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, तसेच यावेळी मध्य रेल्वेचे इतर महत्त्वाचे विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### खेलो इंडिया युवा स्पर्धा

# खो-खोमध्ये महाराष्ट्राची सलग सातव्यांदा 'सुवर्ण' भरारी!

## पदकाचा डबल धमाका; मुलांना सुवर्ण, मुलींना रौप्य

**गया (बिहार) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने आपली हुकूमत गाजवित सातव्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत दोन्ही गटात सलग सातव्यांदा पदकाला गवसणी घातली. मुलांनी सुवर्ण, तर मुलींच्या संघाने रूपेरी यश संपादन केले.

बिपार्ड मैदानावर संपलेल्या खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. मुलांच्या गटात महाराष्ट्राने ओडिशावर ३४-२५ गुणांनी मात करून सलग सातव्यांदा सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. मुलींच्या गटात ओडिशाकडून महाराष्ट्र ३१-३४ गुणांनी पराभूत झाला. केवळ तीन गुणांनी महाराष्ट्राचे सुवर्णपदक हुकले. या संघातील विश्वविजेत्या अश्विनी शिंदे हिने सलग चौथ्यांदा पदक जिंकण्याचा विक्रमही नोंदविला.



मुलांच्या गटात सुरुवातीपासून ओडिशाविरूद्ध महाराष्ट्राने आक्रमक खेळ केला. अचूक गडी टिपून संरक्षणातही महाराष्ट्र आघाडीवर राहिला. जितेंद्र वासवे याने तब्बल दोन मिनिटाची ड्रीम रन करीत ओरीसाला झुंजवले. पूर्वार्धात १६-१० गुणांनी आघाडी घेतल्यानंतर आशिष गौतम, राज जाधव व शरद घाडगे यांनी अष्टपैलू खेळ करीत पहिल्याच फेरीपासून विजयी वाटचाल सुरू केली होती. नऊ गुणांनी विजय संपादून महाराष्ट्राने खेलो इंडियातील आपली सुवर्ण परंपरा कायम राखली. पदकवितरण समारंभानंतर गणपती बाप्पा मोरया, जय भवानी-जय शिवाजी जसघोष करण्यात आला.

मुलींच्या गटात महाराष्ट्राची आक्रमणात पिछेहाट झाल्याने ओरिसाने बाजी मारली. अटीतटीच्या लढतीत पहिल्या मिनिटापासून महाराष्ट्राने चपळ दर्शवली. अमृता पाटील, सुहानी धोत्रे व प्रतीक्षा बिराजदार यांचा अष्ट्रपैलू खेळ सामना जिंकण्यासाठी अपुरा ठरला. गडी बाद करण्यात अपयश आल्याने ओडिशाने तीन गुणांनी विजेतेपद पटकावले. खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींचे हे सातवे पदक आहे. गत तामिळनाडू स्पर्धेत महाराष्ट्र चॅम्पियन ठरला होता.

# घन:श्याम मशीलकर यांची ॲथलेटिक्स स्पर्धेत 'सुवर्ण' हॅट्‌ट्रिक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

इंडो-नेपाळ फ्रेंडशीप इन्व्हिटेशन इंटरनॅशनल साऊथ एशिया मास्टरर्स ॲथलेटीक्स चॅम्पियनशीप नेपाळ येथे झाली. या स्पर्धेत रिस कांबे (ता. खालापूर) येथील घनःश्याम श्रीकृष्ण मशीलकर यांनी भारताचे नेतृत्व करून तीन सुवर्णपदके जिंकली.

स्पर्धेत भारत, नेपाळ, भुतान, थायलंड, श्रीलंका आदी देशांतील ४०० खेळाडू सहभागी झाले होते. यात मशीलकर यांनी ५० वर्षावरील गटात लांबउडी, तिहेरी उडीमध्ये आणि १०० मीटर धावणेमध्ये सुवर्णपदक पटकाविले. ते पाताळगंगा येथील रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये कामाला आहेत. क्रीडा क्षेत्रातील यशाबद्दल मशीलकर यांचे अभिनंदन होत आहे.

# खेलो इंडिया स्पर्धेत कबड्डीमध्ये महाराष्ट्राला रौप्यपदक

**राजबीर : वृत्तसंस्था**

हरियाणाने कबड्डीतील हुकुमत कायम राखत ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला नमवित सुवर्णपदक पटकावले. ३९-२८ गुणांनी हरियाणाने बाजी मारली. महाराष्ट्राला रौप्यपदकाचा मानकरी ठरला.

बिहारमधील राजबीर क्रीडा संकुलात विजयाचा चौकार झळकवित महाराष्ट्राने अंतिम फेरीत मजल मारली होती. अपेक्षेप्रमाणे अंतिम मुकाबला बलाढ्य हरियाणा विरूध्द महाराष्ट्राच्या कबड्डीपटूंनी चिवट झुंज दिली. पहिल्या फेरीत २२-१७ गुणांनी महाराष्ट्राने आक्रमण करीत आपले आव्हान कायम राखले होते. उत्तरार्धात हरियाणाच्या यशस्वी चढय्या आणि बचावात अपयश आल्याने महाराष्ट्राची पिछेहाट होत राहिली. लोणमुळे पिछाडी वाढत गेल्याने मनोबल खचलेल्या महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. गतवेळी कांस्यपदक संपादन केले होते.



# गोशीन रियु कराटेचा उन्हाळी कॅम्प

**उरण : बातमीदार**

गोशीन रियु कराटे असोसिएशनने ग्रीन हेरिटेज समर्थ वाडा, कर्जत येथे कराटे ट्रेनिंग कॅम्प आयोजित केला होता. या कॅम्पमध्ये रायगड जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी झाले होते.




कॅम्पमध्ये स्पोर्ट्स कराटे, सेल डिफेन्स, काता, कुमिते, चाकू, रायफल शूटिंग यांचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच विघ्नेश विशाल पाटील व नेहा विशाल पाटील यांना फस्ट डिग्री ब्लॅक बेल्ट व अंजा माने यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला.

कॅम्पचे आयोजन इंडिया प्रेसिडेंट सिहान राजू कोळी यांनी केले होते. या वेळी गोपाळ म्हात्रे, राकेश म्हात्रे, परेश पावस्कर, सुलभा कोळी, निकिता कोळी, विघ्नेश कोळी, कृष्ण कोळी हे इन्स्ट्रक्टर उपस्थित होते.

# दोरी मल्लखांबमध्ये महाराष्ट्राचे दुहेरी यश

**गया** : आर्या साळुंखे आणि तनश्री जाधव या महाराष्ट्रीयन खेळाडूंनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत मल्लखांब या देशी खेळातील दोरीच्या मल्लखांबमध्ये अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदके जिंकून दुहेरी धमाका केली.

स्पर्धेत आर्याने एक सुवर्ण, दोन रौप्यांसह पदकाची हॅट्‌ट्रिक, तर तनश्रीने तीन रौप्य, एक कांस्यासह पदकांचा चौकार झळकविला. मुलींच्या विभागातील दोरीच्या मल्लखांब प्रकारात साताऱ्याच्या आर्या साळुंखेने सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर तनश्रीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

# आयपीएल स्थगित; बीसीसीआयचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली** : भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. सध्या सुरू असलेले आयपीएलचे उर्वरित सामने स्थगित करण्यात आले आहे. पाकिस्तानकडून ८ तारखेच्या रात्री भारतावर ड्रोन हल्ले करण्यात आले. त्यामुळे धरमशाला इथे सुरू असलेला पंजाब किंग्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्सचा सामना मध्येच थांबवण्यात आला होता. त्यानंतर रात्रभर भारताची धडक कारवाई, पाकिस्तानकडून अधूनमधून होणारे हल्ले या पार्श्वभूमीवर आयपीएलचे उर्वरित सामने स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# रायगड जिल्हा बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने सागर चेस अकॅडेमी आयोजित मुला-मुलींच्या ७ व ९ वर्षाखालील जिल्हा बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा कर्जत येथील बाबा इंटरनॅशनल स्कूलमध्ये झाली. यात १३० स्पर्धकांनी सहभाग घेतला.




स्पर्धचे नियोजन नॅशनल इन्स्ट्रक्टर सागर वाघमारे तसेच टूर्नामेंट डायरेक्टर अजय तळभंडारे यांनी केले होते. उद्घाटन बाबा इंटरनॅशनल स्कूलच्या प्रिन्सिपल व ट्रस्टी आशा ठोंबरे यांच्या हस्ते झाले, तर बक्षीस वितरण महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे खजिनदार व रायगड जिल्हा अध्यक्ष विलास म्हात्रे, सी.एन. पाटील, अमित कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पंच म्हणून अंकित जोशी, सहायक पंच कपिल कोलमकर, सीद्धी वानखेडे यांनी काम पहिले. सात वर्षाखालील प्रथम दोन मुले व दोन मुली पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी रायगडचे प्रतिनिधित्व करतील, तर नऊ वर्षाखालील प्रथम दोन मुले व दोन मुली सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी रायगडचे प्रतिनिधित्व करतील.

**गटनिहाय विजेते**

सात वर्षाखालील मुले : प्रथम आरव देशमुख, द्वितीय आद्रिक वर्मा, मुली : प्रथम अस्मी राजपूत, द्वितीय मनस्वी आडे; नऊ वर्षाखालील मुले : प्रथम हेमांग धिमन, द्वितीय शिवांश करिया, मुली : प्रथम सोनम हरियान, द्वितीय आर्या शर्मा.

# पेणमधील ए वन बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंचे यश



**पेण : प्रतिनिधी**

बॉक्स रिंग आणि मुंबई बॉक्सिंग क्लबतर्फे आयोजित मुंबई बॉक्सिंग कप स्पर्धा नुकतीच कांदिवली येथील एमसीए ग्राऊंडवर झाली. या स्पर्धेत पेण येथील ए वन बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी यश मिळविले आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत यश जोशी आणि सदाफ पठाण यांनी रौप्यपदकाची कमाई केली, तर विभागीय स्पर्धेत निशिगंध पाटील, श्रवण मानकावळे, अगस्त्या म्हात्रे, अथर्व गौर यांनी सुवर्ण आणि राजनंदिनी पुजारी, अश्वघोष भोपाळे, साईराज गायकवाड यांनी रौप्यपदक पटकाविले. या सर्वांना प्रशिक्षक अनिश ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

जीवेत् शरदः शतम्!



प्रवीण बढे

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
महादेव यादव

जीवेत् शरदः शतम्!



धर्मेंद्र म्हात्रे

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
संकेत पोटले

वर्ष १२ वे | ।। ॐ बाळकृष्णाय नम:।। | स्थापना २०१४



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
**पिताजी**
**श्री. चांगू काना ठाकूर**



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
माताजी
**श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर**



श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

बारावा पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी **'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर'** यांची बारावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२, शके १९४७ **शुक्रवार दि. ०९/०५/२०२५** रोजी **सकाळी १०.०० वा. श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर**, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे पारायण श्री दासबोध वाचण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, **शनिवार दि. १०/०५/२०२५** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

शनिवार, दिनांक १०/०५/२०२५

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० - भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ, रांजणपाडा (खारघर)<br>बुवा : श्री. निवृत्ती बुवा चौधरी,वसंतशेठ पाटील-कोपर, ज्ञानेश्वर म्हात्रे-गव्हाण, गणपत ठाकूर- कोपर, भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर-शि.नगर, नितीन ठाकूर- त. पाडा, श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : निलेश पाटील |
| **सकाळी १०.०० ते १२.००** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

कार्यक्रमाचे ठिकाण
**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**
**मु.शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५**

व्यवस्थापक
**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
**शिवाजीनगर- गव्हाण-न्हावेखाडी- कोपर (संचलित)**

संयोजक
**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com